# हाकारा

जुलै-सप्टेंबर २००१

वर्ष : बावीसावे • अंक : तिसरा



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| अध्यक्ष | : प्रा. रा. के मुटाटकर |
| उपाध्यक्ष | : डॉ. विजय भानू |
| मुख्य सचिव | : डॉ. सुधाकर मोराणकर |
| सह सचिव | : पुरूषोत्तम आगाशे |
| खजिनदार | : जयवंत मंत्री |
| सभासद | : ॲड. पद्माकर वळवी (आमदार) |
| | : डॉ. मिलिंद बोकील |
| | : सुधीर जोग |
| | : गणपत पंडित |
| | : आरती कौलगेकर |
| | : सुमेध गुर्जर |

*दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त जाती, इतर अकिंचन कष्टकरी वर्ग आणि स्त्रिया यांच्या शोषणमुक्तीसाठी जर कुठे लोकशाहीच्या तत्त्वावर चळवळ संघटित होत असेल तर तिला पाठिंबा देणे, तिच्याशी आपल्या विचारांचा अनुबंध राखणे हे मी माझे कर्तव्य समजतो. प्रबोधनाची हीच खरी योग्य दिशा आहे, असे मला वाटते.*

**– गं. बा. सरदार**

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक**

# हाकारा (त्रैमासिक)

वर्ष : बावीसावे ● जुलै-सप्टेंबर २००१ ● अंक : तिसरा

*संकल्पना व प्रेरणा*
कै. गं. बा. सरदार

*संपादक - मुद्रक - प्रकाशक*
रामचंद्र मुटाटकर

*कार्यकारी संपादक*
ग. शां. पंडित

*संपादक मंडळ*
मिलिंद बोकील
सुधीर जोग
श्रीनिवास इंदापूरकर
पुरूषोत्तम आगाशे

*अक्षर जुळणी*
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे

*मुद्रण स्थळ*
ज्ञानप्रबोधिनी मुद्रण विभाग, पुणे ३०

*मुखपृष्ठ छायाचित्र*
परिषदेच्या संग्रहातून

*प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता*
६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७
फोन / फॅक्स : (०२०) ५८८७२११

अंकाचे मूल्य : रूपये २५/-

## अनुक्रम

संपादकीय
डॉ. विनायक तुमराम यांचे भाषण ३
आदिवासींची जमीन लुबाडणारे......
रा. वि. भुस्कुटे ११
भगवान बिरसा मुंडा
ना. सी. पाटील १४
गुण गावे आदिवासी विद्यार्थ्यांचे
सुरेखा बनकर १६
वनभोजन कार्यक्रम
वीरसिंग पाडवी २०
डांग सेवा मंडळ
ना. सी. पाटील २१
अज्ञात समाजसेविका - कमलबाई
ज्योत्स्ना पाटील २५
होबाय यात्रा कार्यक्रम
वीरसिंग पाडवी २६
बीजपंप पुरवठा - संशोधनात्मक अभ्यास
एस. पी. गिरासे २८
पंचायत राज - आव्हानांचा विचार ३७
मोठी माय (कथा)
रंजना कान्हेरे ४१
कविता ४६
संवाद ४७

या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

'अस्मिता आणि विकास' या विशेषांकानंतर थोड्याशा विलंबाने हा अंक प्रसिद्ध होत आहे. काही तांत्रिक कारणांमुळे हा विलंब असल्याने वाचक समजून घेतील ही अपेक्षा.

'हाकारा' च्या नेहमीच्या विशेषांकाच्या परंपरेला फाटा देऊन हा अंक सर्वसाधारण विषयावर काढलेला आहे. ज्यांना आदिवासी जीवनावर लिहावे वाटले अशा काही लेखक लेखिकांच्या साहित्याला या अंकात स्थान दिले आहे; परंतु त्याच बरोबर सर्वश्री विनायक तुमराम, रा. वि. भुस्कुटे, एस. पी. गिरासे यांचे लेखन आवर्जून वाचावे असे आहे.

आदिवासी जीवन व संस्कृतीचा इतिहास सांगता सांगता त्यांच्या अस्मितेची, धर्माची, त्यातील समस्यांची ओळख डॉ. विनायक तुमराम यांनी करून दिली आहे. त्यांच्या ओघवत्या भाषाशैलीच्या प्रभावामुळे लेखनाला वेगळेपण प्राप्त झाले आहे.

श्री. रा. वि. भुस्कुटे हे आदिवासींच्या जंगल, जमिनीच्या प्रश्नावर सतत लेखन करीत असतात. या अंकातील लेखातही त्यांनी शासनाच्या आडमुठे धोरणावर आपल्या प्रभावी भाषेने प्रहार केले आहेत. त्यांचे अभ्यासपूर्ण लेखन वाचकालाही विचारमग्न करते.

प्रा. डॉ. एस. पी. गिरासे यांनी तळोदा येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत वीजपंप संच पुरवठा योजनेचा संशोधनात्मक अभ्यास करून त्यातल्या त्रुटी दाखवून दिल्या आहेतच; त्याबरोबर काही उपायही सुचविलेले आहेत.

पंचायत राज संस्थांच्यापुढे कोणती आव्हाने आहेत, याची ओळख याविषयावरील लेखातून होते. याशिवाय ना. सी. पाटील, वीरसिंग पाडवी, ज्योत्स्ना पाटील इत्यादींचे लेखनही आदिवासी संस्कृतीचे वेगळेपण दाखवून देते.

वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया कळवाव्यात.

**- संपादक**

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अंशतः अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

अ. भा. क्रां. नारायणसिंह उईके संघर्ष समिती, चंद्रपूर

जयंती - पुण्यतिथी समारंभ, प्रकाशन समारंभ तथा

# आदिवासी अस्मिताजागर संमेलन - २००१

## स्वागताध्यक्ष प्रा. डॉ. विनायक तुमराम यांचे भाषण

"दारिद्र्य, वेठबिगारी व अन्याय-अत्याचार यात खितपत पडलेल्या आदिवासींना उलगुलानचा महामंत्र देणारे भारतमातेचे थोर सुपुत्र क्रांतीकारक वीर बिरसा भगवान, आदिवासींच्या न्याय्य हक्कांसाठी व सेवेसाठी आयुष्य वेचणारे कुशल संघटक नेते क्रांतिवीर नारायणसिंहजी उईके, आदिवासींचे धार्मिक व सामाजिक प्रबोधन करून त्यांची अस्मिता जागविणारे संतद्वय प. पू. रघुराज महाराज-मुंगशुजी महाराज आणि आदिवासींसकट सर्वहारा समाजाच्या हितासाठी - मुक्तीसाठी जे लढले व संपले त्या सर्व ज्ञात-अज्ञात कृतीवीरांना माझी विनम्र आदरांजली।

मूल नगरात व गोंडवनाच्या या पावन भूमीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर हे अस्मिता जागर संमेलन साजरे होत असताना पाहून मला फार आनंद वाटतो. याप्रसंगी सुख-दुःखाचे चार बोल आपणाशी बोलून मन हलके करावे, यासाठीच मी आपणापुढे उभा आहे. आपण कोण आहोत, आपण काय केले पाहिजे, आपली दशा ओळखून नेमके कोणत्या दिशेने गेले पाहिजे आणि राष्ट्राप्रती आपले दायित्व कोणते यासाठीच हा शब्दप्रपंच।

आदिवासी हा या भूमीचा मूळ धनी व भारतीय गणराज्याचा प्रथम नागरिक आहे; या प्रखर वास्तवाला आता कोणत्याही साक्ष-पुराव्यांची गरज नाही. व्यवस्थेला ही कदाचित न भावणारी पण ऐतिहासिक पुराव्यांनी मान्य केलेली डोळस वस्तुस्थिती आहे. मानवाचा सुसंबद्ध इतिहास जेथून सुरू होतो, त्याही पूर्वीच्या काळात टोळ्याटोळ्यांनी जगणारा आदिवासी समाज सांस्कृतिक वाटचाल करीत कालांतराने सत्तास्थानी आला, राज्यकर्ता बनला व स्थिरावला. मोहेंजोदडो-हडप्पाचे सांस्कृतिक व सामाजिक वैभव याचा सबळ पुरावा आहे. मध्ययुगीन काळात गोंड, भिल्ल, महादेव कोळी यांसारख्या आदिवासींनी गोंडवनात, भिलवाड्यात व कोळवनात मोठमोठी, सुस्थिर व संपन्न राज्ये निर्माण केली व अनेक शतके चालविली; म्हणूनच तो भूभाग त्या जमातींच्या नावाने आज ओळखला जातो.

याशिवाय संथालांचे परगणे हलबा-हलबींच्या जमीनदाऱ्या आणि मुंडांचे जंगलराज हे सर्व आदिवासी जमातींच्या संपन्नतेचे पुरावे होत. पण आज ही वैभव-संपन्नता गेली कुठे? याचे उत्तर महात्मा फुलेंच्या समग्र वाङमयात सापडते. ते म्हणतात,

*" गोंड भिल्ल क्षेत्री होते मूळ धनी*
*इराणी मागुनी आले येथे*
*शूर भिल्ल कोळी शराने तोडीले*
*हाकलून दिले रानोवनी "*

(महात्मा फुले समग्र वाड्मय, १९८०, द्वि. आ., पृ.क्र. ४९६ वरून उद्‌धृत)

यावरून गतकाळात काय घडले असावे हे ध्यानात येईल.

बाहेरचे आक्रमक या भूमीत या ना त्या कारणाने - इराद्याने सरसावले व वसले. येथील मूळ धनी आदिवासी त्यांच्या क्रौर्याला बळी पडले. ते भंगले, विखुरले व बाटवलेही गेले. दिशाहीन, बेघर होऊन त्यांनी जंगलजिव्हारांचा रस्ता धरला. गिरीकुहरांचे सानिध्य निवडले. निबीड अरण्य हाच एकमेव पर्याय त्यांच्यासाठी उरला होता. बाहेरच्यांनी इथल्या मूळच्यांना हुसकावून व पिटाळून लावले. व्यवस्था त्यांच्याप्रती कठोर झाली.

ती आपल्यासारखीच हाडामांसाची, भावभावनांची चालतीबोलती माणसे आहेत हा भावच लोप पावला. व्यवस्थेने त्यांना 'रानबंद' केले. खबरदारीचे फर्मान सोडले, ग्राम-मुखंडांनी सोयीस्कर मौन पाळले, त्यांच्या मौनाला वाणवून व्यवस्थेने ते मौन व्रत म्हणून घोषित केले. या मौनव्रताने आदिवासींना गर्तेत लोटले. तत्कालीन वाङ्मयाने तर त्याहीपुढे एक पाऊल टाकले.

असूर, राक्षस, चेपट्या नाकाचे, धरतीवरचे पापी जीव, रानटी, लंगोट्ये, पिशाच्च, गिरीजन अशा उपरोधिक व अपमानजनक शब्दांनी त्या साहित्याने त्यांना संबोधले. (वर्तमानातही दूरदर्शनसारख्या माध्यमातून हेच सुरू आहे, ही दुर्दैवी बाब आहे.) वैदिक व अवैदिक असा भेद स्थिरपद झाला. वर्णव्यवस्था वंदनीय झाली. आक्रमक सत्तास्थानी आले व सत्तेतील मूळ लोक जंगलपहाडात डांबले गेले. आपण कुणाचे काही हिरावले, कुणाला तरी हुसकावले, कुणाचे तरी घर बळकावले आणि म्हणूनज आपण कुणाचे तरी अपराधी आहोत; हा भावच साहित्याने साफ पुसून टाकला. बाहेरच्यांनी, 'आम्हीच इथले मूळनिवासी आहोत' अशी खोटी बतावणी करणारे साहित्य निर्मिले. जंगलसीमेवर पहारे ठेवून रानगर्भ धगधगते ठेवले. कठोर निर्बंध लादून व्यवस्थेने माणसांना विभागून टाकले. चातुर्वर्ण्यामुळे व्यवस्थेच्या आतील व बाहेरील जनजीवन अक्षरक्षः तळले गेले. ग्रामव्यवस्थेपासून शेकडो योजने दूर असलेल्या मूळ मानवसमूहांकडे तर अक्षम्य दुर्लक्ष व्यवस्थेने केले. स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासींची स्थितीगती फार दयनीय होती.

देशाला स्वातंत्र्य मिळाले. घटनाकारांनी दिलेल्या सोयीसवलतींचा लाभ उठवून आदिवासींमधील थोडेफार लोक शिकून सवरून पुढे आले. आदिवासी थोडाफार बोलू व लिहू लागला. प्रबोधनाच्या चळवळींचा रेटा व वैचारिक जागरणाचा प्रभाव यामुळे रानबंद आदिवासींची दशा पालटायला सुरुवात झाली. स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षात आदिवासींचा जो काही विकास घडून आला ही त्याचीच फलश्रुती म्हणावी लागेल. या विकासात अनेक महापुरूषांचा मोलाचा वाटा आहे. त्यांची नामावली मोठी आहे. त्यामुळे त्यांचा नामदिनिर्देश टाळून त्यांच्याप्रती याप्रसंगी मी जाहीर कृतज्ञता तेवढी व्यक्त करतो. थोड्या फार आदिवासींची दशा पालटली खरी; परंतु बहुसंख्य समाज जैसे थेच राहिला. दिशाहीन जगला व आजही जगत आहे. अधून मधून दिशा गवसल्याचा मृगजळी सूर कानावर येत असतो. पण तोही लगेच विरून जातो.

एक गोष्ट येथे स्पष्ट केली पाहिजे, ती म्हणजे

आदिवासी हे कोणत्याही एका विशिष्ट जाती-जमातीचे नाव नव्हे. या मातीचा रंग आणि गंध ज्यांनी आपल्या अस्मितेचा श्रृंगार मानला, त्या सर्व मूळ टोळ्यांचे समूहनाम म्हणजे आदिवासी. त्यांना स्वत:चा धर्म, देवदेवता, सण-समारंभ, इतिहास व अर्थपूर्ण संस्कृती आहे. मूलतः हिंदू वर्णव्यवस्थेच्या चौकटीबाहेरील हे लोक आहेत हे आधी ध्यानात घेतले पाहिजे. त्यांचा मूळ धर्म हिंदू, इस्लाम, जैन, बौद्ध किंवा खिश्चन नाही हेही समजून घेतले पाहिजे. दुर्दैवाने त्यांचा स्वतंत्र सामुदायिक धर्म आणि पारंपरिक कायदा यांचा फारसा अभ्यास आजवर झाला नाही. त्यांचे अस्तित्व आणि स्वरूप अद्याप स्पष्ट झाले नाही. त्यामुळे हिंदुंच्या अथवा इतर धर्मियांच्या (आदिवासी ज्या धर्माचा असेल त्या कायद्यानुसार) कोर्ट कचेरीत त्यांचे न्यायनिवाडे केले जातात.

आदिवासी लोक पूर्वी टोळ्याटोळ्यांनी राहात असत. प्रत्येक टोळीचा एक प्रमुख असायचा. त्याच्या सुरक्षित व सुजाण नेतृत्वात टोळीची वाटचाल असे. त्यावेळी हिंदू हे काय आहे याची जाणीव व त्यासंबंधीचे ज्ञानही त्यांना नव्हते आणि ते असण्याचे काही कारणही नव्हते. आपला पारंपरिक मूळ धर्म, संस्कृती व कायदा यांना अनुसरूनच आदिवासी टोळ्यांचे जगणे-वागणे व व्यवहार होते.

सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या त्यांच्यात कसलाही भावनिक दुरावा नव्हता. एकात्मभावाने व सामुदायिक शहाणपणाने त्यांची वाटचाल होती. हिंदुंच्या किंवा अन्य धर्मियांच्या देवदेवतांचे पूजन करणे, त्यांचे सण-समारंभ साजरे करणे आणि हिंदुच्या जातीव्यवस्थेनुसार गोंड, परधान, थोटी, माडिया, हलबा-हलबी, कोलाम, पारधी, भिल्ल, कोरकू, संथाल, मुंडा, खासी, मिना, अशी जातीप्रथा पाळणे या सर्व गोष्टी त्यांच्यात मुळीच अस्तित्वात नव्हत्या. आपसी हेवेदावे व रोटीबेटी बंद व्यवहार असा कसलाही प्रकार आदिवासी टोळ्यांमध्ये प्रारंभी नव्हता. एकात्मतेचे सुंदर उदाहरण व्हावे अशीच व्यवस्था या टोळ्यांनी निर्माण केली होती. एकात्मभाव हे त्यांच्या टोळीसमूहाचे आधारदेठ होते. परंतु जातीप्रथा पाळणे, एकमेकांना उच्च-नीच मानणे आणि आपली संस्कारमूल्ये सोडून हिंदुंच्या अथवा अन्य धर्मियांच्या संस्कार प्रभावाखाली जगणे असे प्रकार आज का दिसतात याबाबत स्टेफन फक्स यांची पुढील नोंद फार महत्त्वाची आहे, ते लिहितात,

"It is stated that, all these tribes interdined and intermarried frequently and without any uppleasant consequences. The cast discrimination was introduced among them when the leading tribes came into contact with Hindus and gradually adopted their caste principles"

(Aboriginal Tribes in India, Page No.43 या ग्रंथावरून उद्धृत)

यावर अधिक भाष्य करण्याची गरज नाही. सहज कळू शकेल इतके ते स्वयंसिद्ध आहे; परंतु झपाट्याने सुरू असलेल्या नागरीकरणाच्या व धर्मांतराच्या प्रक्रियेत आदिवासी समाज बदलत चाललेला आहे. त्याची मूळ सांस्कृतिक चौकट सैल व जीवनमूल्ये अस्थिर होऊ लागली आहेत. त्यांच्या वंशविच्छेदनाची व धर्मसंस्कृतीच्या उध्वस्तीकरणाची प्रक्रिया वेग धरू लागली आहे

त्यांच्या समूहजीवनाचे प्रतल कंपायमान होऊ लागले आहेत.

जंगल जिव्हार, लंगोटी व शिकार यासोबतच धाक, दहशत आणि नक्षलवाद हेही त्याचा पाठलाग करीत आहेत. वनवासी कल्याण आश्रमांचे जाळे रानभर पसरवून आदिवासींच्या वनवासीकरणाचे कुटील डाव साधले जात आहेत. आदिवासींच्या मानसिकतेवर आज चहुबाजूंनी अनेक आघात होऊ लागले आहेत. उत्थानाच्या वाटा कशा अंधारून आलेल्या आहेत! एकेकाळचा क्षेत्रपती व राजा असलेला हा आदिवासी धास्तावलेला आणि सुस्तावलेलाही दिसतो आहे. भूतकाळाने तर छळलेच, पण वर्तमानही मागे नाही. आदिवासींच्या घातावर सतत असलेला इथला इरसाल वृत्तीसमूह गतकाळात होता व आजही आहे. तो पूर्वीपेक्षा अधिक सतर्क व सज्ज आहे. सर्व जीवनव्यवहारात या वृत्तीसमुहाने आदिवासींच्या बाबतीत जाणीवपूर्वक कुचराई केली, म्हणूनच यातनामयी जिंदगीचे ओझे वाहणे त्यांच्या वाट्याला आले.

आता हे सर्व कधीतरी बदलले पाहिजे असे आपणा सर्वांच्याच मनात आहे. आपल्या अस्तित्व - अस्मितेचा जागर आता आरंभिला पाहिजे, असे सर्वांनाच वाटत आहे. सबुरीसबुरीने कुठवर जगायचे? लाचारी, दैना व उपहास कुठवर सहायचा? मांगल्यहीन संसाराचे ओझे कुठवर पाठीवर वहायचे? लांब पल्ल्यांचे आपले दुःख आहे, त्यासाठी कुठवर रडत बसायचे? कुणाच्या दयेवर-दानावर कुठवर राहायचे? असे अनेक प्रश्न आपणा सर्वांच्या डोक्यात अलिकडे उठू लागले आहेत. या सर्व प्रश्नांची साधार उत्तरे शोधण्यासाठी व एकमेकांना समजून घेण्यासाठी आज आपण येथे एकत्र आलो आहोत. आपले काय व कुठे चुकले याची फेरतपासणी व त्याचे अंकेक्षण करण्याचा इरादानेच आपण सर्व आज जन्मलो आहोत. नव्या-जुन्या आघातांनी आदिवासींच्या मानसिकतेत काय परिवर्तने घडून आलीत याचाही शोध या संमेलनात आपण घेणार आहोत. परिवर्तनाच्या वादळी प्रक्रियेत आपली भूमिका काय राहणार आहे, हेही आपण आज ठरविणार आहोत.

आजच्या या पावन पर्वावर आपल्या सर्वांच्या साक्षीने दोन गोष्टींची मी निर्णायक चर्चा करू इच्छितो. त्यापैकी एक गोष्ट म्हणजे - आदिवासींच्या धर्मांतराची व दुसरी त्यांच्या राजकीय पक्ष उभारणीची। आदिवासींना उज्ज्वल इतिहास आहे. समृद्ध बोली भाषा आहेत; त्या बोलीभाषांमधून प्रगटलेले व मौखिक परंपरेने त्यांच्या पिढ्यानपिढ्यांतून येथवर झिरपत आलेले लोकवाङमय आहे, मानवी मनाचा ठाव घेणारे लोकसंगीत त्यांचेपाशी आहे, सर्वश्रेष्ठ कलाही त्यांनी जपल्या आहेत आणि साहित्यमंचाचे ते धनी आहेत. भक्कम सांस्कृतिक अधिष्ठानावर हा समाज ता मानेने उभा आहे. सर्वश्रेष्ठ संस्कृती म्हणून आदिवासी संस्कृतीचा गौरव संपूर्ण जग करते आहे. आपणही मोठ्या अभिमानाने हे सांगत असतो.

बिरसाचा उलगुलान, वीर बाबुरावचे हौतात्म्य, राणी दुर्गावतीचे रणकौशल्य, शंकरशहा रघुनाथ शहाचे वीरमरण, तंट्या भिल्ल, उमाजी नाईक, उमेड वसावा, भागोजी नाईक, राघोजी

भांगरा या नरवीरांचे क्रांतीसत्र, सिद्धु - कान्हु या संथाल बंधुंचा जीवनसंघर्ष, लोकशिक्षक क्रां. नारायणसिंहजी उईके यांचे प्रबोधन पर्व आणि संतद्वय प. पू. रघुराज व मुंगशुजी महाराज यांचा आदिवासी जनजागर या सर्व भूतकालीन घटना आपण मोठ्या अभिमानाने सांगतो व चवीने ऐकत असतो. त्यांचा आदर्श पुढे ठेऊन आपणही काही करावे अशी उर्मी आपल्यात जागते. पण दुर्दैवाने ती उर्मी लगेच मावळतेही. उर्मीचे मावळणे हाच आपल्या पिछेहाटीचा आरंभ ठरतो. प्रबोधन कार्याची मात्रा घेणाऱ्यांनी काही पथ्ये साभाळलीच पाहिजे. क्षणिक वैराग्य काही कामाचे नाही. वृत्तीचे वैराग्य टिकले व निश्चयाला सातत्याचा आधार मिळाला तरच परिवर्तनाची काहीतरी अपेक्षा आपण करू शकतो, अन्यथा आपले सारे सामूहिक प्रयत्न व्यवस्थेचे काही बिघडवू शकणार नाही हे आधी समजून घेतलेले बरे. ज्या धर्मांतरासंबंधी मी सांगणार आहे, त्यासाठी आपली धैर्यभूमी सज्ज असावी. म्हणून हे लिहिणे गरजेचे वाटले. आता आपण मूळ मुद्याकडे वळूया.

आदिवासी हिंदू नाहीत असा आवाज आदिवासी समाजात अलिकडे उभरू लागला आहे. त्यामुळे विचारवंतांसकट सामान्य बुद्धीचा माणूसही संभ्रमित झाला आहे. आदिवासी हिंदू नाहीत तर मग ते कोण आहेत? त्यांना स्वतःचा धर्म आहे काय? असेल तर तो कोणता? हिंदू धर्माव्यतिरिक्त त्यांचा आणखी कोणता धर्म आहे काय? त्यांना मुळात कोणताच धर्म नसेल तर ते कोण आहेत? अशा अनेक प्रश्नांची आदिवासी समाजात चर्चा होताना दिसते. मात्र या चर्चेतून कुठलाही ठोस निष्कर्ष न निघाल्याने धर्माविषयी निर्णायक भूमिका घेणे अनेकांना कठीण जाऊ लागले आहे. परिणामी आदिवासींच्या धर्मांतराचा जोर वाढू लागला आहे. प्रलोभनापोटी ही धर्मांतरे होत आहेत.

साम्यवादाचे जनक कार्ल-मार्क्स याने धर्माला अफुची गोळी म्हणून संबोधले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र धम्माला आदराचे स्थान दिले. धम्माची गरज व त्याचे महत्त्व जाणून धर्मांतर केले. जगातील सर्व मानव समुहांना त्यांची ओळख देणारी धर्म व संस्कृती अशी दोन ओळखपत्रे आहेत व त्यांनी ती जपून वापरली आहेत याचा विसर आपण पडू देऊ नये. या पार्श्वभूमीच्या आधारे विचार करता आदिवासींजवळ संस्कृती नावाचे फक्त एकच ओळखपत्र आहे. धर्माचे ओळखपत्र त्यांचेजवळ आहे काय? त्यांनी धर्मापासून का ढळावे? धर्माविणा आदिवासी समाज उभा राहू शकेल काय? आदिवासींना स्वतःचा धर्म नसावा काय? आदिवासींनी धर्मांतर करावे की आपल्या मूळ धर्माचे पुनरूज्जीवन करावे? असे प्रश्न माझ्याही पुढे आहेत. त्याची चर्चा मला आपल्यासमोर करावीशी वाटते.

आदिवासींचे स्वयंभू पुढारी क्रांतीवीरे. नारायणसिंहजी उईके म्हणाले होते, "आदिवासींना संघटीत करण्याची शक्ती फक्त त्यांच्या सांस्कृतिक अधिष्ठानातच आहे. सत्ता संपत्तीचे आकर्षण व भ्रष्ट मार्गाने व्यक्तीविकास आदिवासींना गर्तेत लोटील."

उईकेजींनी सांस्कृतिक अधिष्ठानासोबत धार्मिक अधिष्ठानाचाही विचार मांडला असता तर ते अधिक चांगले झाले असते. त्यादृष्टीने

विचारचक्र केव्हाच गरगरू लागले असते. असो, आज गोंडी धर्मा चे तुणतुणे सर्वत्र वाजताना दिसते. ते वाजवणाऱ्या स्वयंघोषित व स्वनामधन्य आचार्यांचे गाजरगवती पीक सर्वत्र वेगाने येऊ लागले आहे. खरेतर महान तत्ववेता पुराणपरूष लिंगोचे वैश्विक तत्वज्ञान या आचार्यांना नीटसे कळलेले दिसत नाही. कळले असेल तरी केवळ विशिष्ट जातीपुरतेच मर्यादित ठेवण्याची त्यांनी कदाचित शपथ घेतली असावी. या आचार्यांना व त्यांच्या चेल्याचपाट्यांना केंद्र बिंदूकडून परिघाकडे विस्तारत जाणेच मुळात मान्य नाही असे दिसते. खरेतर गोंड ही एक जमात आहे. गोंडी ही तिची मातृभाषा आहे. मग गोंडी भाषा ही धर्म कशी होऊ शकेल? कारण धर्म ही समूहधारणा आहे. सामूहिक कृतीतून व शहाणपणातून त्याचा स्वीकार व विस्तार होत असतो. सामूहिक हिताचा विचार त्यात असावा लागतो. एका विशिष्ट जातीचा / जमातीचा धर्म संभवत नाही.

म्हणूनच गोंडी धर्माची संकल्पनाच मला पोचट व तत्वज्ञानशून्य वाटते. कारण जनाधार नसलेली व सर्वस्पर्शिता हरवून बसलेली ती एक भ्रमयात्रा आहे, असे मला वाटते. असे का वाटते, त्याची कारणे आहेत. भगवान बिरसा मुंडाने बिरसा धरम ची संकल्पना रूजविली व विस्तारली. हा धरम गोंडी धर्मियांना मान्य आहे काय? गोंडी धर्म बिरसा धर्मियांना पटेल काय? प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतःची एक स्वतंत्र धार्मिक वहिवाट आहे. तिलाच त्या जमातीचा धर्म म्हणता येईल. मुंडांचा धर्म कदाचित संथालांना मान्य होणार नाही. भिल्लांचा धर्म कदाचित मुंडांना पटणार नाही; गोंडांचा गोंडी धर्म / कोयतून धर्म कोरकू, कोलाम, वारली, महादेव कोळी, खासी, गारो यांना कदाचित भावणार नाही; तर नागांचा धर्म इतर आदिवासींना चालणार नाही. अशा परिस्थितीत सर्व आदिवासी जमातींना एका धाग्यात बांधणारा, सर्वांना सोबत घेऊन चालणारा व सर्वांना मान्य होणारा सार्वजनिक व सामायिक धर्म असल्याविना त्याला आदिवासी धर्म म्हणता येणार नाही. आज अशा धर्माचा शोध घेण्याची गरज आहे. धर्माचे प्रस्थ आज खूप वाढले आहे. संपूर्ण जग कसे धर्मवेडे बनले आहे. तत्त्वज्ञान, सेवाभाव, मानव्य, परोपकार, अहिंसा, दया, क्षमा, प्रज्ञा, करूणा, शांती ही सारी मूल्ये मानवाच्या जगण्या-वागण्यातून आज बाद झाली आहेत. धर्म केवळ अविवेकी झुंडशाहीचे हत्यार झाले आहे. अशा वातावरणात आपण नव्या धर्माचा विचार करण्यास धजावलो आहोत, कुठल्याही धर्मशाहीला बळी जाण्यापेक्षा स्वधर्माचा विचार व स्वीकार करण्यात गैर काय?

यासंबंधी दिनांक २१ फेब्रुवारी २००१ रोजी लिंगो मैदान रामदासपेठ, नागपूर येथे आयोजित भव्य महाशिवरात्री पूजा उत्सव उद्घाटक म्हणून मी उपस्थित आदिवासी नेते व प्रचंड जनसमुदाय यांचेपुढे सविस्तर भाषण केले आहे. आदिवासींच्या धर्मासंबंधी मी तेथे जे मुद्दे मांडले तेचं महत्त्वाचे मुद्दे आज आपणा सर्वांपुढे मांडू इच्छितो. त्याचा सर्वांनी गांभीर्याने विचार करून निर्णायक भूमिकेप्रत यावयाचे आहे. मला जे वाटते त्याचे प्रारूप असे -

१. आदिवासी हे हिंदू नाहीत किंवा ते मुळात कोणत्याही धर्माचे नाहीत.

२. आदिवासींना त्यांचा अती प्राचीन पारंपरिक व निसर्गवादी मूळ धर्म आहे. हा धर्म याच भूमीतील असून सर्वांचा आधार आहे.

३. अशा मूळ आदिवासी धर्माचे पुनरूज्जीवन करून त्या सर्व आदिवासींनी दीक्षा समारंभ आयोजित करून सामुदायिक दीक्षा घ्यावी.

४. आदिवासी मूळ धर्म असे या धर्माचे नाव असावे.

५. आदिवासी मूळ धर्माचे लिखित तत्त्वज्ञान असावे म्हणजेच धर्मग्रंथ असावा.

६. त्याच्या उभारणीसाठी राष्ट्रीय स्तरावर किंबहुना जागतिक स्तरावर आदिवासी धर्म संसद स्थापन व्हावी. प्रत्येक आदिवासी जमातीतील बांधिलकी मानणारा अभ्यासक व विचारवंत या धर्म संसदेचा सदस्य असावा.

७. प्रत्येक आदिवासी जमातीच्या मूळ व अस्सल तत्त्वज्ञानाचे (अंधश्रध्दा, व कालबाह्य रूढी, परंपरा पूर्णतः वगळून) व चांगल्या विचार-मूल्यांचे प्रतिबिंब ज्यात असेल असा हा धर्मग्रंथ असावा. त्याचे स्वरूप व्यापक व प्रकृती निसर्गवादी असावी.

८. या धर्माची नोंद भारतीय राज्य घटनेत करण्यात यावी तरच अखिल विश्वापुढे ताठ मानेने हा धर्म उभा राहू शकेल.

९. यामुळे फार मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली आदिवासींच्या धर्मांतराची प्रक्रिया थांबविण्यास निश्चितच मदत होईल आणि आदिवासींना कदाचित स्वतःची ओळख पटून त्यांचा आत्मसन्मान जागू शकेल. त्यांना एक नवी दिशा मिळू शकेल.

यादृष्टीने वाटचाल केल्यास एक नवे सर्वांगसुंदर चित्र या देशात उभे राहील. कोणाच्याही धार्मिक भावना न दुखावता किंवा धर्मांतरासारखा अवघड मार्ग न अवलंबिता आदिवासींचे धर्मपरिवर्तन या देशात घडून येऊ शकते असा माझा विश्वास आहे. हे जर घडून आले तर या घटनेची नोंद सुवर्णाक्षरांनी इतिहासात होईल. कारण धर्माविना आदिवासी समाज एकसंघ, एकात्म व मजबूत होऊच शकत नाही. हे काळानेच आज दाखवून दिले आहे. या धर्माची पुढे रीतसर बांधणी व घोषणा मी करणारच आहे. त्यादृष्टीने तुम्ही सर्वांनी सज्ज असले पाहिजे.

धर्माप्रमाणेच राजकीय पक्ष ही सुध्दा काळाची गरज आहे. त्याही दृष्टीने आपण कृती केली पाहिजे. आदिवासींचे स्वयंभू पुढारी स्व. क्रां. नारायणसिंहजी उईके यांनी यादृष्टीने जीवनभर प्रयत्न केला. माझ्यासकट इतर आदिवासी नेते-पुढाऱ्याच्याही मनात ही संकल्पना वसत आहे; परंतु त्यादृष्टीने भरीव सामूहिक प्रयत्न होण्याची गरज आहे. आदिवासी साहित्यिकांनीही यादृष्टीने आपली वाणी व लेखणी झिजवावी. धार्मिक पुनरूज्जीवनाच्या संकल्पसिध्दीला लेखणीचे बळ त्यांनी द्यावे. ही त्यांची सामाजिक बांधीलकी आहे.

हे सर्व करताना मात्र राष्ट्रभावनेला व एकात्मतेला तडा जाणार नाही याची खबरदारी सुध्दा आपण सर्वांनी घेतली पाहिजे. ही भूमी जर आमची आहे तर ती आमची मायभूमी आहे, हे सर्वांनी लक्षात घ्यावे. याच मायभूमीच्या रक्षणार्थ

शेकडो आदिवासी नरवीरांनी आपली जिंदगी बरबाद केली आहे. ते सारे हुतात्मे याच मायभूमीचे सुपुत्र व आपल्या स्वाभिमानाची गौरव शिखरे आहेत, याचा विसर आपण पडू देऊ नये. धर्म जागराचे व अस्मिता संवर्धनाचे कार्य मुळात कठीण असले तरी अशक्य नाही. हे कार्य करताना, बील बर्न बॅच या पाश्चात्य विचारवंताने म्हटल्याप्रमाणे स्थिती उद्‌भवण्याचा संभव नाकारता येत नाही. तो म्हणतो.

"if you stand for something you will always find some people for you and some against you. If you stand for nothing you will always find nobody for you and nobody against you."

यातील इत्यर्थ समजून घ्यावा. 'स्वातंत्र्य आणि स्वाभिमानाचे धनी असलेल्या माझ्या स्वातंत्र्यप्रिय आदिवासी बांधवांनो - निर्भय व्हा। बिरसाचा उलगुलान तुमच्या मनगटांची स्फूर्ती व ताकद होऊ द्या। जातीपातीचे हेवेदावे दूर सारून एकमताने एकदिलाने कार्य सिध्दीस लागा. केवळ स्वतःपुरते न पाहता परार्थत्यागवृत्तीने जगा. सर्व रंजले-गांजले यांना आपले समजून त्यांचीही सेवा करा यातच माझे समाधान आहे. सभोवतालच्या हळहळत्या जगाशी नाते जोडू नका.'

"ओस झाल्या दिशा। मज भिंगूळवाणे।
जिवलग नेणे। मज कोणी।।"

संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे आपली गत आहे. तेव्हा प्रयत्नांची पराकाष्ठा करून अंधारलेल्या व ओस दिशांकडे झेपावण्याची किमया करून तुम्ही दाखवाल एवढीच सदिच्छा व्यक्त करून शब्दांना पूर्णविराम देतो. "

जय सेवा - जय उलगुलान। !!!

●●

(पृष्ठ १५ वरून पुढे)

चरित्रावर, लढ्यावर बिरसा धर्मावर आणि उलगुलान-जन भावनेचा उद्रेक म्हणजे आदिवासींनी एकाच वेळी एकसंघ होउन न्यायासाठी हक्कासाठी स्वातंत्र्यासाठी न्यायाची व्यापक लढाई म्हणजे उलगुलान. दिक्कूच्या हकालपट्टीसाठी व्यापक जन आंदोलन म्हणजेच उलगुलान, हे प्रा. विनायक तुमराम यांनी या छोट्याशा चरित्रात्मक ग्रंथात नमूद केले आहे. त्यांच्याशी पुणे येथे अस्मिता अधिवेशनात चर्चा करून आदिवासी समाजापुढे एक आदर्श उभा करण्यासाठी तरूणांना बिरसाबद्दल आदरभाव निर्माण करण्यासाठी हा लेख लिहिलेला आहे.

जय उलगुलान-जय बिरसा धरम!

●●

(पृष्ठ १९ वरून पुढे)

अल्पभोजी व गृहत्यागी, चिकाटी इ. गुणांचे बनलेले हे आदिवासी मुलांतील फूल कोमजून जाता कामा नये. निसर्गाने प्रदान केलेले असो की अनुवंशिकतेने त्यांच्यात उतरलेले गुण असो त्या व्यक्ती गुणाबरोबर त्यांच्यातील रंगीबेरंगी इतर अनेक सुप्त व अव्यक्त गुणांना वाव देण्यासाठी त्यांना जाणवत असलेल्या अडचणी व समस्येच्या सोडवणुकीचा विचार समाजातील सर्वच घटकांनी केला पाहिजे, तरच त्यांच्या गुणांची कदर केल्यासारखे होईल.

●●

प्रा. सुरेखा बनकर
गणपती गल्ली, तळोदा, जि. नंदूरबार

# आदिवासींची जमीन लुबाडणारे महाराष्ट्राचे दुःशासन !

रा. वि. भुस्कुटे

कुळकायद्याप्रमाणे लिमजी रडका धोडी या आदिवासीला वसा, तालुका तलासरी येथील दीड एकर जमीन विकत मिळाली. त्याचे नावे ती झाली. गावच्या कागदपत्रात तशी नोंद झाली. त्या जमिनीचा सातबारा त्याला मिळाला. अजूनही ही जमीन त्याच्याच नावे आहे. या जमिनीप्रमाणेच मौजे कुर्झे तालुका जव्हार येथील १४ हेक्टर जमीन रडका जानू गोंड या आदिवासीला कुळकायद्याप्रमाणे विकत मिळाली. ही जमीन गावचे कागदपत्रात त्याचे नावे आहे. या दोन्ही जमिनी कुळकायदा आणि आदिवासींच्या जमिनी बाबतीतील कायद्याप्रमाणे विक्री, गहाण, दान वगैरे कोणत्याही प्रकारे हस्तांतरणीय नाहीत. आदिवासींची जमीन हस्तांतरीत करायची असेल तर शासनाच्या पूर्व संमतीने जिल्हाधिकारी यांचे परवानगी घ्यावी लागते.

वसा येथील धोडी यांची जमीन रस्त्याला लागून आहे. ती सोयीची वाटल्याने ठाणे जिल्हा परिषदेनी काही वर्षांपूर्वी धोडी यांना भूलथापा देऊन त्यांची ६० आर जमीन ताब्यात घेतली. एक फसवा बेकायदेशीर कराराचा कागद तयार केला. त्या जागेवर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती बांधल्या. जागेला कंपाऊंड घातले. तेथे समारंभपूर्वक आरोग्य केंद्र सुरू केले. आजही ते चालू आहे; परंतु काही वर्षे उलटून गेल्यानंतरही कबूल केल्याप्रमाणे धोडी यांना पर्यायी जमीन दिली नाही आणि अर्थशास्त्र विषय घेऊन ग्रॅज्युएट झालेल्या त्यांच्या मुलाला जिल्हा परिषदेत शैक्षणिक लायकीप्रमाणे नोकरीही दिली नाही.

कुर्झे तालुका जव्हार येथेही असेच झाले. आदिवासी कल्याणाचा मक्ता घेतलेल्या महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास खात्याने भूलथापा देऊन रडका जानू गोंडच्या १४ हेक्टर जमिनीपैकी एक हेक्टर जमीन आदिवासी आश्रम शाळेसाठी ताब्यात घेतली. ही जमीन दानपत्राने गोंड यांनी दिली असा आदिवासी विकास खात्याचा दावा आहे. या जागेत आश्रम शाळेची इमारत उभी केली. आश्रम शाळेचे उद्घाटन आदिवासी खासदार, आमदार यांचे उपस्थितीत मोठ्या दिमाखाने करण्यात आले; परंतु कबूल केल्याप्रमाणे गोंड यांच्या मुलाला मात्र आश्रमशाळेत नोकरीला लावण्यात आले नाही.

वसा येथील धोडी यांची प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी दीड एकर जमीन महाराष्ट्र शासनाच्या पूर्व संमतीने आणि जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडून कायदेशीर परवानगीने जिल्हा परिषदेनी घ्यावयास पाहिजे होती. गावचे कागदपत्रात ही जमीन जिल्हा परिषदेच्या नावे करून घ्यावयास पाहिजे होती. आदिवासीला फसवून घेतलेल्या जमिनीच्या या कृत्याला निदानपक्षी कायदेशीर स्वरूप द्यावयास पाहिजे होते; परंतु आदिवासी आपले काय करणार आहे, असे गृहीत धरून जिल्हा परिषदेनी तसे

काहीएक केले नाही. अद्यापही ही जमीन धोडी यांचेच नावे सातबारामध्ये आहे.

कुर्झे तालुका जव्हार येथील आदिवासी विकास खात्याने आश्रमशाळेसाठी घेतलेल्या श्री. गोंड यांच्या जमिनीबद्दलही अगदी असेच घडले आहे. गोंड यांचेकडून जमिनीचे दानपत्र घेतले आहे, असा आदिवासी विकास खात्याचा दावा आहे. विक्री, गहाण, भाडेपट्टा, दानपत्र वगैरे कोणत्याही प्रकारे आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरण करता येत नाही, याचे साधे भान आदिवासी विकास खात्याने ठेवलेले नाही.

तसेच आदिवासींच्या जमिनीच्या हस्तांतरणास शासनाची पूर्व संमती लागते आणि त्यानंतर जिल्हाधिकारी ठाणे यांचीही परवानगी घेणे कायद्यानी बंधनकारक आहे याचाही विचार आदिवासी विकास खात्याच्या जबाबदार उच्च श्रेणीच्या अधिकाऱ्यांनी केलेलाच नाही, असे कदापीही मानता येणार नाही. आदिवासी विकास खात्याच्या अधिकाऱ्यांच्या बेपर्वा, बेजबाबदार वृत्तीमुळे हा बेकायदेशीरपणा हेतुतः झालेला आहे, असेच मानावे लागेल.

वसा येथील धोडी आणि कुर्झे येथील गोंड हे आदिवासी असले तरी सुसंस्कृत, संवेदनाशील होते आणि आहेत. आपली जमीन सार्वजनिक उपयोगासाठी वापरली जात आहे हे लक्षात घेऊन त्यांनी खूप संयम केला. कोणतेही आततायी कार्यवाही केली नाही. जिल्हा परिषद आणि आदिवासी विकास खात्याकडे सातत्याने दीड दोन वर्षे पत्रव्यवहार केला. त्यांच्या मुलांना कबूल केल्याप्रमाणे नोकरी द्यावी म्हणून अनेक विनंती अर्ज पावले. जिल्हा परिषद आणि आदिवासी विकास खात्याकडे त्यांनी अनेक हेलपाटे मारले. संबंधित बेपर्वा अधिकाऱ्यांनी त्यांना दुरूत्तरे केली. तीही त्यांनी सहन केली. वसाचे धोडी यांनी तर वकिलामार्फत जिल्हा परिषदेला कायदेशीर नोटीसही दिली. पण त्याचे हे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. आदिवासी विकास खात्याने आदिवासीची जमीन बळकावणे म्हणजे "कुंपणानेच शेत खाणे" असा हा निंदणीय प्रकार झाला आहे.

आदिवासीची जमीन बेकायदेशीरपणे बळकावून त्यावर दवाखान्याची आणि आश्रमशाळेची इमारत बांधण्यात आली. थोडक्यात या दोन आदिवासींच्या जमिनी जिल्हा परिषदेनी आणि आदिवासी विकास खात्याने म्हणजेच शासनाने लुबाडल्या आहेत. या दोन्ही जमिनी कुळकायद्याप्रमाणे आदिवासींना विकत मिळाल्या असल्याने त्या कायद्याच्या कलम ४३ च्या अधीन आहेत. तेव्हा या जमिनीचे हस्तांतरण उपविभागीय अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय होऊ शकत नाही. तशी परवानगी घेतली नसल्याने कुळकायद्याचा भंग झालेला आहे. या दोन्ही जमिनी आदिवासींच्या मालकीच्या आहेत. त्या हस्तांतरणीय नाहीत.

तेव्हा आदिवासींच्या जमिनीविषयक कायद्याच्या तरतुदींचाही उघड उघड भंग करण्यात आलेला आहे. आदिवासींकडील शेती प्रयोजनाच्या या दोन जमिनीचा वापर बिनशेतीसाठी करण्याकरिता जमीन महसूल संहिता १९६६ चे तरतुदीप्रमाणे रीतसर बिनशेती परवानगी घेणे जरूरीचे आहे. तशी परवानगी या दोन जमिनींबाबत घेतली नसल्याने त्याही कायद्याचा भंग जिल्हा परिषद आणि आदिवासी विकास खात्याने केलेला आहे.

वसा येथील श्री धोडी यांची जमीन आणि कुर्झे येथील श्री गोंड यांची जमीन आदिवासी विकास खात्याने १९८९ नंतर बेकायदेशीरपणे कब्जात घेऊन त्यावर इमारती बांधल्या आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ चे कलम ३ प्रमाणे या दोन्ही आदिवासींवर संबंधित उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी अत्त्याचार केलेला आहे. कायद्यापुढे सर्व समान आहेत या तत्वानुसार हे अधिकारी या कायद्याच्या तरतुदीप्रमाणे दंड आणि कारवासाच्या शिक्षेस पात्र ठरतात.

मौजे वसा तालुका तलासरी आणि मौजे कुर्झे तालुका जव्हार येथील या दोन्ही जमिनी गावचे सातबारात अद्यापही आदिवीसींचे नावे आहेत. या दोन्ही जमिनींचे हस्तांतरण कायदेशीरपणे जिल्हा परिषदेनी आणि आदिवासी व्रिकास खात्यांनी करून घेतलेले नाही. तेव्हा या जमिनींचा त्यावरील इमारतींसह आदिवीसींनी कब्जा घ्यायचे रवले तर त्यांना नक्कीच तो घेता येईल आणि तसे त्यांनी केले तर त्यांना दोष देता येणार नाही.

कोणत्याही कायद्याचा आधार घेऊन जिल्हा परिषदेला किंवा आदिवासी विकास खात्याला त्यांचेविरूब्द काहीएक कारवाई करता येणार नाही. हे निर्विवाद आहे. मग या परिस्थितीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र आणि आश्रम शाळा बंद होईल, तसेच जिल्हा परिषदेनी लाखो रूपये खर्च करून आरोग्य केंद्राच्या इमारती बांधल्या आहेत, तर कुर्झे येथे काही लाख रूपये खर्च करून आश्रमशाळेची इमारत बांधली आहे. जिल्हा परिषद आणि सरकारने केलेला हा लाखो रूपयांचा खर्च वाया जाणार आहे.

बिगर आदिवासी सवर्णाप्रमाणे आदिवासींवर जुलूम जबरदस्ती करणे, त्यांच्या जमिनी लुबाडणे, त्यांच्यावर अत्त्याचार करणे हा आपला विशेषाधिकार आहे, असा काहीतरी गोड गैरसमज जिल्हा परिषद आणि आदिवासी विकास खात्याच्या अधिकाऱ्यांचा आहे असे यावरून दिसून येते. अधिकाऱ्यांच्या या बेपर्वा माजोरी कृत्यामुळे महाराष्ट्र शासनाची बदनामी झाली आहे. आदिवासी विरोधी महाराष्ट्र शासन आहे असा समज पसरला आहे. कसाही विचार केला करी हे अनिष्ट व घातक आहे. तेव्हा शासनाने याची गंभीरपणे दखल घेतली पाहिजे. संबंधित अधिकाऱ्यांविरूब्द दया-माया न दाखवता कडक कारवाई केली पाहिजे.

त्याचप्रमाणे आदिवासींच्या जमिनींवर बेकायदेशीरपणे इमारती उभारण्यासाठी शासनाचा लाखो रूपयांचा झालेला खर्च या मग्रूर, बेजबाबदार अधिकाऱ्यांकडून पूर्णपणे वसूल केला पाहिजे. एवढेच नाही तर या अधिकाऱ्यांविरूब्द शासनाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ प्रमाणे रितसर गुन्हा दाखल केला पाहिजे; परंतु महाराष्ट्राच्या दु:शासनाकडून हे होणे नाही. उलट शासन या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची पाराखण करण्याचा, त्यांना संरक्षण देण्याचा संभवच अधिक आहे.

●●

**रा. वि. भुस्कुटे**
'अंजली' प्लॉट नं. ६५, सुलभ हौसिंग सोसायटी,
वडवली, अंबरनाथ (पू.), जि. ठाणे.

# जनचेतनेचे विद्रोही रूप भगवान बिरसा मुंडा

ना. सी. पाटील (आदिवासी सेवक)

महाराष्ट्रात शिवाजीराजे यांच्या मावळा पलटणीमध्ये अनेक आदिवासींचा सहभाग होता, तर राजस्थानमध्ये हल्दी घाटी लढाईत अनेक भिल्ल स्वातंत्र्यासाठी राणा प्रतापाच्या बाजूने लढले होते. मध्य प्रदेशात तात्या भिल्ल् यांची नोंद तंट्या भिल्ल म्हणून जेलमध्ये केली गेली. अशा विरांनी आदिवासींचे स्वतंत्र संघटन उभे करून जमीनदार, मालगुजर आणि इंग्रजांविरूध्द लढा दिला आहे.

अशाच प्रकारे बिहार, छोटा नागपूर विभागात वीर बिरसा मुंडा यांनी आदिवासींना संघटित करून स्वातंत्र्याची, स्वतंत्र राज्याची स्वप्ने १८६० ते १९०० या कालखंडात पाहिली आहे. या स्वातंत्र्य योद्ध्याची माहिती महाराष्ट्रात फारसी नाही. तथापि अलिकडचे प्रा. डॉ. विनायक तुमराम यांनी बिरसा मुंडाचे चरित्र लिहून विदर्भात, प्रामुख्याने गोंडवनात चंद्रपूर गडचिरोली भागात बिरसा मुंडाचा आदर्श निर्माण करण्यासाठी एक छोटेसे चरित्र प्रसिध्द केलेले आहे. त्यांनी अस्मिता जागर संमेलनात स्वागताध्यक्ष म्हणून एक प्रभावी भाषणही बिसवा मुंडा यांचे जीवनावर केले आहे आणि धर्म निश्चितीचे आव्हान आदिवासींना केले आहे.

"अबुराज ऐतेजन महाराणी राज टूंडू जन," असे स्वप्न बिरसा मुंडा विद्यार्थी दशेतच पाहात होते. तसे पाहिले तर खिश्चन मिशनरी शाळेत शिक्षण झालेला बिरसा मुंडा याने खिश्चनांची इंग्रजाची चाल विद्यार्थी दशेतच ओळखली होती आणि विदयार्थी दशेतच इंग्रजांविरूध्द आंदोलने सुरू केली. त्यामुळे त्यांचे शिक्षणही खंडीत झाले.

आपल्या आंदोलनात मुंडा जातीबरोबर इतर आदिवीसी जमातींनाही समाविष्ट करून घेणे हे बिरसा मुंडाच्या कार्याचे वैशिष्ट्य आहे, आणि म्हणून त्याचे आंदोलन सरदारी आंदोलन म्हणून प्रसिध्द पावले. स्वहित रक्षणाचे सरदार आंदोलन एक प्रभावी साधन होते. आदिवासींच्या स्वातंत्र्य लढ्याची ती एक ललकारी होती. बिरसाला पडलेल्या स्वातंत्र्य स्वप्नाने एक बळ दिले होते.

### सेवा कार्यातून जन जागरण

बिरसा हा लढवय्या होता, हे खरे असले तरी तो समाज सुधारकही होता. १८९४ च्या छोटा नागपूर भागातील दुष्काळात आदिवासींना धान्य रूपाने मदत करण्याचे त्याने मोठे कार्य केले. याच बरोबर त्याने वनशुल्क माफीचे आंदोलनही सुरू केले. मोर्चे, आंदोलने काढली आणि संघटन अधिक मजबूत केले. यातून वैचारिक क्रांतीचा जन्म झाला. वनशुल्क ठेवू नका वेठबिगार करू नका, जंगलावर आदिवासींचा पहिला अधिकार आहे, तो मिळालाच पाहिजे याची जाणीव आदिवासींना करून दिली. आदिवासींचे शोषण करणाऱ्यांना बिरसा मुंडा "दिक्कू" असे संबोधत असे.

## बिरसाला जेलमध्ये पाठविले

बिरसाच्या आंदोलनामुळे पी.सी.धारा ३३५/५०५ प्रमाणे त्याचे अटकेचा आदेश निघाला. पोलिस यंत्रणा सशस्त्र सैनिकांसह वलकदरा भागात रवाना झाली आणि रात्री झोपेत असतानाच या भगवान अबा बिरसा मुंडावर झडप घालून पकडण्यात आले आणि खटला भरला गेला. बिरसाला २ वर्षांची सजा झाली आणि त्यास हजारी बाग जेलमध्ये `वण्यात आले. त्याने स्वातंत्र्यासाठी जेलचा सहवास सहन केला.

मात्र १८९६ ते १८९७ या काळात महाराणीच्या हिरक महोत्सवानिमित्ताने बिरसाची सुटका करण्यात आली. सुटका झाल्यावरही बिरसाने स्वराज्यासाठी आपला लढा सुरू केला. जाज्वल्य देशभक्ती प्रगट केली.

## स्वातंत्र्य मागण्याचे निवेदन आणि गोळीबार

खुंटी पोलिस ठाण्यावर बिरसाने हजारो जनसमुदायासह मोर्चा नेला. मात्र या मोर्चावर इंग्रज अधिकाऱ्यांनी गोळीबार केला. जालीयनवाला बाग प्रमाणे अनेक आदिवासी मृत्युमुखी पडले. शहीद झाले. घायाळ झाले. सापडेल त्या आदिवासीवर स्त्री-पुरूष म्हातारे यांवर दमन सत्र सुरू झाले, धरपकड झाली. आदिवासींना तुरूंगात डांबले. त्यांच्या वस्त्या उद्‌ध्वस्त केल्या. शेट सावकार, जमीनदार, मालगुजार, यांनी इंग्रजांना साथ केली, मिशनरी फादर लोकही विरोधात गेले. बिरसाने २५ डिसेंबर १८९९ रोजी खिसमस डे पाहून चर्चवर हल्ले चढविले, अनेक फादर, मिशनरी इंग्रज अधिकारी यांना धनुष्य बाण आणि दगडांच्या सहाय्याने जेरीबंद केले. त्यामुळे इंग्रज अधिकारी चिडून बिरसाचा साथीदार गया मुंडा याच्या घरावर रात्रीचे वेळी त्याच्या हल्ला करून गोळीबार केला. त्यात एका ठाणेदार हुसेनवर एका मुंडाने कुऱ्हाडीने वार केला आणि तो धाडकन कोसळला. गयाचे घरातील मुलां-बायांसह धुमचक्री झाली. त्यात गया मुंडा मारला गेला. सर्व कुटुंबालाच अटक झाली आणि जेलमध्ये डांबले. या परिवाराचे इंग्रज जेलरने बरेच हाल केले.

बिरसा सिंगभूज छोटा नागपूर जवळच्या जिल्ह्यात होता. कठिण परिस्थितीत या भागातून तो आंदोलन चालवत होता. तथापि स्वातंत्र्य युद्धात फितूर पणाही कमी नव्हता. फितुरीने खबर दिली आणि बिरसाला चारही बाजूने घेरले. त्याला बेडीबंद केले. त्यामुळे समाज ढळा ढळा रडला. बिरसा त्यांना सांगतो, “मी पुन्हा जन्म घेईन आणि तुमच्यात येईल. तुम्हाला खात्रीपूर्वक वचन देतो. माझे विचार माझ्या मातृभूमीत सजतील त्या दिवसाची वाट पहा. तो दिवस निश्चित उगवेल.” प्रकृतीमुळे जेलमध्ये बिरसा खचला होता. त्याने २० मे १९०० या दिनापासून अन्न वर्ज्य केले आणि प्रकृती ढासळत चालली. क्षीण होत गेला. काही दिवसांनीच म्हणजे ९ जून १९०० रोजी बिरसा जेलमध्ये शहीद झाला. स्वातंत्र्याचे धगधगते रण कुंड विझले. सरकारने बनाव केला आणि कॉलऱ्याने बिरसा मुंडाचा मृत्यू झाला, असे वर्तमान पत्राद्वारे जाहीर करण्यात आले. तो दिवस होता ९ जून १९०० चा १०१ वर्षापूर्वीचा ‘धरती अबा’ या छोट्याशा ग्रंथात त्याच्या जीवन

*(पृष्ठ १० वर पहा)*

# गुण गावे आदिवासी विद्यार्थ्यांचे

प्रा. सुरेखा बनकर

**मा**तृभाषेची शिक्षिका या नात्याने मला आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या गुण वैशिष्ट्यांचा जवळून अनुभव आला. धुळे नंदुरबार जिल्हा आदिवासींची जास्त लोकसंख्या असलेला, त्यातल्या त्यात तळोदा तालुका आदिवासींचा म्हणूनच ओळखला जातो. धडगाव, मोलगी काठी, अक्कलकुवा, शिर्वे इत्यादी दुर्गम व अतिदुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थीनी तळोदा महाविद्यालयात कनिष्ठ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकण्यासाठी येत असतात. वसावे, पाडवी, गावीत, प्रधान, धानका, वळवी, तडवी इत्यादी आडनावाची मुले-मुली संख्येने अधिक असतात. यांच्याविषयी माझ्या मनात अनेक समज-गैरसमज घर करून होते.

आदिवासींची बोलीभाषा वेगळी असते. त्यामुळे त्यांना मराठी भाषा नीट बोलता, वाचता व लिहिता येत नाही. ते मांस-मच्छी खाणारे असतात. अस्वच्छ राहतात. अविश्वासू असतात इ. अनेक गोष्टींनी माझ्या मनात घर केले होते. परंतु अनुभवांनी त्या सगळ्या बिनबुडाच्या ऐकीव स्वरूपाच्या गैर गोष्टी ठरल्या. "खरे आणि खोटे यामध्ये चार बोटांचे अंतर असते," ही परंपरागत जुनी मराठी म्हण किती अर्थपूर्ण आहे, असे वाटू लागले. माझे पदवी व पदव्युत्तर शिक्षण तळोदा आणि नंदूरबार महाविद्यालयात झाले असल्यामुळे माझ्या काही आदिवासी समाजातील मैत्रिणीही होत्या. त्यावेळेस त्यांच्या अल्पशा वेळेतील सहवासातून त्यांच्याविषयीचे अनेक गैरसमज दूर होण्यासाठी मदत झाली. त्यांची स्वच्छता, सुंदर अक्षर, प्रामाणिकपणा शाकाहारी जेवण व अनेक गोष्टींविषयी आपुलकी इत्यादी गोष्टीतून अनौपचारिकता मला ठळकपणे जाणवली होती. इतरांपासून आपल्या बऱ्याच बाबतीतील वेगळेपणामुळे त्यांच्या मनात न्यूनगंडाची भावना त्यांच्या बोलण्यातून बऱ्याच वेळा स्पष्ट-अस्पष्ट जाणवत होती. त्यांची बोलीभाषा वेगळी असली, शब्दउच्चारातील वेगळेपणा दिसत असला तरी अनेक आदिवासी मुला-मुलींनी पदवी स्तरावर मराठी हा विषय विशेष अभ्यास करण्यासाठी घेतला होता. त्यापैकी अनेकांनी विद्यापीठीय परीक्षेत चांगले गुण प्राप्त करून उत्तीर्णही झाले होते.

मराठी विषयाचे अध्यापन करताना या आदिवासी मुला-मुलींमध्ये अनेक चांगले गुण मला दिसले. त्यांपैकी काही गुण त्यांच्या वैयक्तिक उन्नती व प्रगतीसाठी पूरक ठरणारे असून काही गुण अध्यापन प्रक्रियेसाठी उपयोगी पडणारे, नव्हे तर अत्यावश्यक असणारेच आहेत. आपणास दिसलेले गुण नुसते गायचे नाहीत तर ते आवडीने, आनंदाने मुक्तपणे गावे, याप्रमाणे आदिवासी मुला-मुलींमधील ठळक गुणांचा उल्लेख करत आहे.

एका संस्कृत श्लोकात विद्यार्थ्यांमध्ये कोणते गुण असावे याविषयी म्हटले आहे.

*"काकदृष्टी, बकोध्यान*
*श्वाननिद्रा, अल्पभोजी*
*गृहत्यागी विद्यार्थी पंचलक्षणम्।"*

कावळ्यासारखी दृष्टी म्हणजे कावळा जसा इकडचे-तिकडचे चांगले दिसेल ते घेऊन पोट भरतो. तसे विद्यार्थ्याने अनेक पुस्तकातून चांगले तेवढे घेऊन आपली ज्ञानाची भूक भागवली पाहिजे. बकोध्यान म्हणजे बगळ्यासारखे विद्यार्थ्याचे ध्यान असावयास हवे. आपले साध्य, लक्ष्य, भक्ष्य संपादण्यासाठी बगळा जसा एकाग्र होतो, त्याप्रमाणे विद्यार्थ्याने ज्ञान संपादन प्रक्रियेत विद्यासंपादन करण्यासाठी मनाची एकाग्रता ठेवावी. श्वाननिद्रा म्हणजे कुत्र्यासारखी झोप हवी. विद्यार्थ्याची झोप कमी म्हणजे विज्ञानाच्या नियमानुसार केवळ सहा तास झोप माणसाला पुरेशी असते. हा नियम लक्षात ठेवूनच विद्यार्थ्यांनी झोपेतूनच विश्रांती घ्यावी. चाहूल लागताच कुत्रा जसा जागा होतो तसे विद्यार्थ्याने आपल्या परीक्षा जवळ आल्यासच नव्हे तर, नेहमीसाठी सतर्क राहिले पाहिजे.

कुंभकर्णा- सारखी झोप विद्यार्थ्याला नकोच. अल्पभोजी म्हणजे विद्यार्थ्याने नेहमी कमी जेवण करावे याचा अर्थ आवश्यक तेवढेच जेवण घ्यावे. जास्ती जेवणामुळे आपले स्नायू दुसऱ्याच कामासाठी लागतात. त्यामुळे अभ्यासात दुर्लक्ष होते. आळस येतो. झोप येते. हा विज्ञानाचा नियमच आहे. गृहत्यागी म्हणजे शिक्षणासाठी ज्ञान संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आवश्यक तेव्हा घरही सोडावे. घरातील मायाजाला मध्ये अडकून न पडता अनंत अडचणींवर मात करूनही काही काळासाठी का होईना आपल्या घराचा त्याग केला पाहिजे.

या सर्व गुणांनी जो मुक्त असेल तो खरा विद्यार्थी. असे जरी आपण ठरवले तरी आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये यापेक्षा अधिक गुणांचा समुच्चय आहे. जो की अध्यापन प्रक्रियेस उपयोगी नव्हे तर अत्यावश्यक असतो. आदिवासी विद्यार्थ्याने वरील संस्कृत श्लोकामधील पंचलक्षनम् गुणांचा अवलंब केलेलाच आहे. शिक्षणासाठी आश्रमशाळा वसतिगृहात राहतात, अर्थात त्यांना आवश्यक तेवढेच जेवण मिळत असेल, तेथील नियमामुळे त्यांची झोप कुत्र्यासारखी झोपून जागी असल्यासारखीच आणि अनेक प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शिक्षण घ्यावयाचे म्हणजे त्यांच्याकडे काकदृष्टी व बकोध्यान असणे स्वाभाविकच आहे. याशिवाय त्यांच्याकडे वळणदार टपोरे हस्ताक्षर, आज्ञाधारकपणा, प्रामाणिकपणा, नम्रता आणि कमालीची एकाग्रताही आहे.

वळणदार टपोरे अक्षर हे केवळ विद्यार्थ्यासाठीच आवश्यक असणारा गुण नव्हे, तर व्यक्तीच्या व्यक्तिमत्वात भर टाकणारा गुण आहे. अलिकडे तर व्यक्तीच्या हस्ताक्षरावरून त्या व्यक्तीचे भविष्य सांगण्याचे प्रयत्न केले जातात. आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये मला पहिला ठळक दिसलेला गुण म्हणजे त्यांचे वळणदार, टपोरे अक्षर, ओळीतील प्रत्येक शब्दाचा व शब्दातील प्रत्येक अक्षरांचा आकार आणि वळण सारखे असल्यामुळे मनोवेधक अक्षरांचा खजिना मला त्यांच्याकडे दिसला. सुंदर वळणदार, ठळकपणा, टपोरे अक्षर ही त्यांच्या अक्षरांची ठळक वैशिष्ट्ये अगदी डोळ्यात भरण्यासारखी असतात. अक्षरांमध्ये त्यांच्या बोलीभाषेच्या प्रभावामुळे उमटलेला अशुद्धपणा असेलही पण अक्षर सुधार

ज्यासाठी खास वह्यांचा वापर व सराव न करता सुंदर अक्षराची देणगी निसर्गदत्तच म्हणावी लागेल, त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अक्षर मोत्यासारखं असावं असे म्हटले जाते. ते बहुसंख्येने मला आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये पाहायला मिळाले.

विद्यार्थी आज्ञाधारक असावा हे विधान आदिवासी मुला-मुलींकडून शिकावयास मिळते. विद्यार्थी या शब्दाला / पात्रतेला आवश्यक व शोभेल तेवढा आज्ञाधारकपणा मला त्यांच्यात दिसला. बी. एड. च्या अर्थात अध्यापन शास्त्राच्या भाषेत सांगावयाचे झाले तर अध्यापन शास्त्राच्या भाषेत सांगावयाचे झाले तर अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थ्यांकडून आज्ञाधारकपणा या गुणाची अपेक्षा मोठ्या प्रमाणात आवश्यक असते. त्याशिवाय अध्यापन व अध्ययन सुकर होऊ शकत नाही. अध्ययनाचे अंतिम उद्दिष्ट गाठण्यासाठी आज्ञाधारकपणा आवश्यक असतो. वर्गाध्यापनात विनाकारण अडथळा आणण्याचे आज-काल जे विविध प्रकार घडल्याचे वाचावयास मिळते अशी एखादी कृती आदिवासी विद्यार्थ्यांकडून घडलेली मला दिसली नाही. वर्गात येताना, वर्गाबाहेर जाताना शिक्षकाला विचारल्याशिवाय व शिक्षकाने अनुमती दिल्याशिवाय ते पुढील कृती करत नाही. वर्गातील शिक्षक प्राध्यापकाने दिलेल्या आज्ञेचे पालन निमूटपणे म्हणण्याऐवजी अगदी सहजपणे म्हणजे आज्ञाधारकपणेच करताना ते दिसतात. त्यामुळे अध्यापकास अध्यापन करण्यास हुरूप आल्याशिवाय राहात नाही.

Honesty is the Best Policy या इंग्रजी म्हणीचा भले त्यांना अर्थ माहीत नसेलही, महात्मा गांधीजींनी 'सत्य हाच ईश्वर' असे म्हटले आहे, हे त्यांनी वाचले नसले तरी आणि खोटेपणाचा आव आणून आपल्यात जे नाही ते आहे असे दाखवण्यात व्यक्तीची संख्या दिवसेंदिवस वाढत असली तरीही सत्यपणा, प्रामाणिकपणा हे गुण आणखीही आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात टिकून आहेत, हे त्यांच्या लहान-सहान कृतीवरून दिसून येते. वर्गात असो की वर्गाबाहेर असो विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाचे, मग ते प्रश्न वही पूर्ण करण्यासंदर्भात, जादा तासाला न येण्यासंदर्भात, परीक्षेतील उताऱ्यासंदर्भातील असो, सत्य काय तेच उत्तर आदिवासी विद्यार्थ्यांकडून मिळत असते.

वर्गात एखादी वही, पुस्तक, पेन इत्यादी वस्तू संदर्भात विचारले असता प्रामाणिकपणे होय अथवा नाही असे उत्तर देतात. परीक्षेत कॉफी या संदर्भात नुसती तोंडी जरी चौकशी / विचारपूस केली तरी त्यांच्याजवळ असेल / नसेल तरी उभे राहून होय / नाही म्हणणे आणि असेल तर काढून देणे इत्यादी उदाहरणे दिसायला लहान-लहान वाटत असली तरी त्यांचा प्रामाणिकपणा या गुणाचीच साक्ष देणारी आहेत. सत्यासाठीच सर्व गोष्टींचा त्याग होऊ शकेल; परंतु सत्याचा त्याग मात्र कोणत्याही गोष्टीसाठी होऊ शकत नाही. असे स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे. त्याची प्रचिती मला आदिवासी मुला-मुलींकडून मिळाली.

"नम्रता म्हणजे ज्ञानारंभ" लीनतेचा गुण संपादन केल्याशिवाय कोणाला काहीच शिकता येणार नाही. असे म्हटले जाते. आदिवासी विद्यार्थीच्या नम्रतेमुळे मला माझ्या विषयाच्या अध्यपनात सुलभता आणता आली. वर्गनियंत्रणाकडे मला अधिक लक्ष देण्याची गरज वाटलीच नाही. संबंधीत तासिकेची घंटा झाल्याबरोबर वर्गात येवून

बसणे, वर्गाध्यापकाने प्रवेश केल्याबरोबर नम्रतापूर्वक उभे राहून शिक्षकाची आज्ञा होताच मेजवर शांतपणे बसतात. आणि दऱ्या-खोऱ्या व पहाडातून आणलेल्या नम्रता गुणांचे दर्शन घडवतात.

हा नम्रतेचा गुण सुद्धा निसर्गाकडूनच त्यांच्याकडे आला असावा. एखादे फळाने भरलेले झाड आपली फळे इतरांना सहजपणे चाखता यावीत म्हणून त्याचा फायदा खाली नम्रपणे वाकतात / झुकतात, तसाच आमचा आदिवासी विद्यार्थी विद्या विनयेन शोभते हे आपल्या वर्तणुकीतून सांगत असतो. ज्या ठिकाणी घमेंड अहंकार आहे, त्या ठिकाणी नम्रता असणार नाही. त्याठिकाणी प्रसन्नता असणार नाही. प्रसन्नतेशिवाय बुद्धीची स्थिरता, एकाग्रता नाही व ज्याठिकाणी बुद्धीची स्थिरता, एकाग्रता नाही त्याठिकाणी यशही नाही. असे नम्रतेविषयीचे महत्त्व यदुनाथ थत्ते सांगतात, तर नम्रता आणि सध्याची जवळीकता स्पष्ट करतांना गांधीजी म्हणतात, पूर्ण नम्रताभाव अंगी आल्याशिवाय सत्य सापडत नाही. या विधानातील अर्थ जणू आदिवासी विद्यार्थ्यांना निसर्गाने यदुनाथ थत्ते व गांधीजींच्या अगोदर कानमंत्राच्या रूपात आपल्या वर्तणुकीतून केलेला दिसतो.

एकाग्रता सामर्थ्याचे लक्षण आहे. एकलव्याची एकाग्रता सर्वांना परिचयाची आहेच शूद्रांना अर्थात क्षत्रियां व्यतिरिक्त धनुर्विद्या शिकण्याचा अधिकार / हक्क नाही. त्याकाळच्या रूढीनुसार एकलव्याला इच्छा असून सुद्धा द्रोणाचार्यांनी धनुर्विद्या देण्याचे नाकारले होते; परंतु जिद्द व मनात इच्छा आणि एकाग्रता असेल तर गुरूअभावी विद्या शिकता येते हे एकलव्याने सिद्ध करून ठेवले आहे. एकलव्याच्या या गुणाची प्रचिती आदिवासी विद्यार्थी आपल्या वर्तनातून पदोपदी देत असल्याचे मला प्रभावीपणे जाणवले. वर्गात बसलेला विद्यार्थी अथवा एखाद्या कार्यक्रमात बसलेली विद्यार्थीनी असो आपले लक्ष विचलित केल्याची चूक / उदाहरण मला दिसले नाही. अगदी एकाग्रतेने वर्गात शिक्षक काय सांगतात याकडे लक्ष असते. त्यामुळे त्यांच्या वर्गात कधी मला शांत बसा। इकडे लक्ष द्या। अशा प्रकारची सूचना बोलण्याची आवश्यकताच भासली नाही. प्रसिद्ध लेखक व तत्त्ववेत्ता एकाग्रतेविषयी लिहितात, "कामे करताना बौद्धिक एकाग्रतेची ज्याला सवय लागलेली असते तो पुढे वाट्टेल त्या गोष्टी साध्य करू शकतो. चांगला वक्ता, लेखक, डॉक्टर, नट, चित्रकार, मुत्सद्दी, रणशास्त्र, विशाद, व्यापारी या सर्वांना महत्त्वाच्या विषयावर एकाग्रतेने विचार व अभ्यास करण्याची सवय म्हणून ते यशस्वी होतात." या प्रसिद्ध विचारवंतांच्या वरील ओळीतील अर्थाप्रमाणे आमचा अनेक गुणांनी युक्त असलेला आदिवासी विद्यार्थी अनेक क्षेत्रात पुढे जाणार/जात आहे हे सत्य लपवता व दडपता येणार नाही.

लोकमान्य टिळकांनी म्हटल्याप्रमाणे, मार्गातील अनेक अडचणी बाजूला सारून जो पुढे पाऊल टाकतो त्यालाच यश मिळते. अलिकडच्या तीरावर बसून जो नुसता संकल्प करतो त्याला यश मिळणार नाही. याप्रमाणे आदिवासी विद्यार्थ्यांना उद्याचा भविष्यकाळ उज्वल असेलही; परंतु त्यांच्यातील एकाग्रता, नम्रता, आज्ञाधारकता, टपोरे वळणदार व सुंदर हस्ताक्षर, प्रामाणिकपणा, काकदृष्टी, बकोध्यान, श्वाननिद्रा,

*(पृष्ठ १० वर पहा)*

# भिल्ल पांडव येथे आदिवासी तरूणांचा वन भोजन कार्यक्रम संपन्न

वीरसिंग पाडवी

**सा**क्री तालुक्यातील पिंपळनेरपासून तर नवापूरपर्यंत सह्याद्री पर्वताच्या उप-पहाडी पट्टा सर्व दऱ्या-टेकड्यांनी व्यापलेला असून या परिसरात आदिवासी भिल्ल, कोकणी मावची लोक मोठ्या प्रमाणात राहात असतात. ह्या परिसरातून नवापूर, पिंपळनेर रस्ता जातो. नवापूर पासून ३० किलोमीटरवर चरणमाळचा घाट चढल्यावर उमरपाटा नावाचे आदिवासी वस्तीचे गाव लागते. ह्या गावापासून सुमारे ४/५ किलोमीटरवर उत्तर दिशेला डोंगरातून रंगावली नदी वाहते. रंगावली नदीचा उगम याच भागात झालेला असून ती खडकातून वाहात जाते व ठिकठिकाणी नदीच्या पात्रात माठेमोठाले धबधबे आहेत. या धबधब्यांना आदिवासी भाषेत घाट असे म्हणतात. त्याचप्रमाणे उमरपाटा गावाच्या उत्तरेला रंगावली नदीत दोन घाट (धबधबे) आहेत.

एका घाटाला भिल्ल पाडवा घाट म्हणून ओळखतात. दुसरा मोठा खोल घाट जवळच आहे. दोन्ही घाटाच्या मधून पायवाट आहे. या पायवाटेवरून पूर्वीच्या काळी नवापूर, पिंपळनेरला पायी जाण्या-येण्याचा मार्ग होता असे उमरपाट्याचे लोक आजही सांगत असतात. रंगावली नदीच्या उत्तरेकडील काठाचा भाग नवापूर तालुक्यात येतो, तर दक्षिणेकडील भाग साक्री तालुक्यात येतो.

भिल्ल पांडव नामक धबधबा आहे. त्याच्या दोन्ही बाजूला डोंगराचे कडे आहेत. ते शंभर ते दीडशे फूट उंचीचे असतील. दक्षिणेकडच्या कड्यात मध्यभागी खडकात कोरलेले असून पाच मूर्तीचे आकार दिसतात. लेणीसारखे खोदकाम करण्याचे प्रयत्न केल्याचे दिसते. वरून खाली सुमारे ५०/६० फूट खोल तर खालून वरती ५०/६० फुट उंचीवर मधोमध या पाच मूर्तींचा आकार दिसतो. तिथपर्यंत माणूस जाऊ शकत नाही. परिसरातील आदिवासी बांधव पूजा करण्यासाठी वरून खाली दोर बांधून झुल्यासारखे करून कधी कधी उतरल्याचे सांगतात. खाली धबधब्याच्या पाण्याच्या पात्रात देखील विहिरीसारखे खडकात कोरले आहे असे उमरपाट्याचे लोक सांगतात. हे उन्हाळ्यात पाणी आटल्यावर दिसते असेही ते सांगतात.

अशा रमणीय व वनश्रीने नटलेल्या ठिकाणी साक्री तालुक्यातील उमरपाटा या गावाजवळ भिल्ल-पांडव येथे उमरपाटा परिसरातील आदिवासी तरूणांचा वन भोजनाचा आगळा-वेगळा कार्यक्रम दिनांक १९ नोव्हेंबर १९९९ रोजी पार पडला. हा कार्यक्रम गेल्या ४/५ वर्षांपासून आयोजित करण्यात येत असतो. मध्यंतरी एक दोन वर्षे मधल्या काळात खंडीत पडला होता. तो या वर्षी पुन्हा सुरू करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची उमरपाटा ग्रामपंचायत हद्दीतील आबूर ह्या गावाचा रहिवाशी, सध्या नंदूरबार येथे नोकरीनिमित्ताने राहणाऱ्या प्रकाश गावित

*(पृष्ठ २४ वर पहा)*

# डांग सेवा मंडळ

## आश्रम शाळा आणि शाळांची वाटचाल

ना. सी. पाटील

'रामकृष्ण मिशन : एक शतकाची वाटचाल' हा ग्रंथ मी वाचला आहे. प्रत्येक संस्थाचालकाने हा ग्रंथ अभ्यासावा म्हणजे संस्था चालविताना किती अडचणींना तोंड द्यावे लागते याची कल्पना येते. अशाच एका प्रसंगी महाराष्ट्र समाज सेवासंघाची वार्षिक मिटींग आटोपून डांगसेवा मंडळाच्या कार्यालयात डोकावलो. कर्तृत्ववान माणसाशी संबंध तोडू नये, हा विचार मनात होताच; त्याच इच्छेने डांग सेवा मंडळात गेलो. दादासाहेब बिडकर अत्यंत चिंताग्रस्त होते. आयुष्यात त्यांना इतके दु:खी मी फक्त श्यामलाताई गेल्यानंतर पाहिले होते.

मी प्रवेश करताच दादांनी दु:खमय वृत्तांत कथन केला की, 'आपण ५० वर्षापासून ही जागा वापरीत आहोत. यात बिल्डर लॉबी विजयी झाली आणि सुप्रिम कोर्टाने जागा सोडावयाची मुदत दिली, त्यामुळे विचारात पडलो आहे.' मी सहज प्रश्न केला की यात विशेष काय? आंबेगणला आपली १२ एकर जागा आहे, तेथे आपले कार्यालय नेऊ. फक्त बँक अकाऊंटसाठी एखादा फ्लॅट घेऊन कार्यालय चालू ठेवू. हा विचार दादांना जरा पटला. मात्र त्यांनी मला अट घातली की आता तू सेवानिवृत्त होतो आहेस. डांग सेवा मंडळात परत पुन्हा काम कर. माझा स्वभाव तसा भिडस्त, मी मागील-पुढील विचार न करता हो म्हणून गेलो. मे ९० अखेर सेवानिवृत्त झालो. तथापि जून, जुलैमध्ये डांग सेवा मंडळात गेलो नाही. कारण माझ्या दुसऱ्या मुलाच्या लग्नाचे नियोजन आणि त्यात पुन्हा ३/४ संस्थांचा आग्रह की, आमचेकडे काम करावे. तथापि दादांनी माझ्याबाबत कार्यकारिणीत रावच करून वलेला असल्यामुळे साने गुरूजी शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी श्री. मा. वि. जोशी आणि आबासाहेब अरिंगळे यांच्या सल्ल्याने मी डांग सेवा मंडळात १ ऑगस्ट १९९० पासून सुपरवायझर म्हणून काम करू लागलो.

डांग सेवा मंडळाचे कार्यालय हलणार, आंबेगणला ऑफिस जाणार ही चर्चा सुरू झाल्यावर आमच्या डांग सेवा मंडळाचे तळमळीचे सहकारी श्री. मोहाडीकर खरे या कामास लागले. त्यांनी कार्यालयीन कागदपत्रांव्यतिरिक्त इतर साहित्य आंबेगण येथे हलविले. तेथे तीन खोल्यांची इमारतही दादांनी लक्ष घालून उभी केली.

दिंडोरी तालुक्यातील आमचे संस्थाचालक कचरूभाऊ, हरिभाऊ यांनी चांगलीच मदत केली. आदिवासी समाजापर्यंत हा व्रृतांत पोहोचला होता. त्यामुळे काही विरोधक गैरसमज पसरवित होते, त्यासाी मी, दादा आणि आमचे दोघे भाऊ यांच्या सल्ल्याने प्रामुख्याने मध्यवर्ती ठिकाणी मेळावे आयोजित केले. मुख्यत: उंबरठाण येथे शाळा वर्धापन दिनानिमित्ताने मेळावा आयोजित केला. कम्युनिष्टाची दहशत असलेल्या या प्रदेशातून या

मेळाव्यास मात्र आम्हांस चांगलेच सहकार्य मिळाले. कारण उंबराणच्या इमारती बांधताना, विटांच्या भट्ट्या लावताना या पुढाऱ्यांच्या वाडवडिलांची साथ मला होती. त्यामुळे माझ्या बापाचे हात या शाळा विकासास लागले म्हणून त्यांना अभिमानही वाटू लागला. त्यांच्या भावना त्यांनी बोलून दाखविल्या. त्यांचे वडील माझे मित्रच होते. त्यांनी मात्र एकच मागणी केली, ती म्हणजे उंबरठाण येथे ज्युनिअर कॉलेज काढावे. त्यांच्या आग्रही मागणीमुळे तसा प्रस्ताव डांग सेवा मंडळाचे व्रतीने आम्ही १९९१/९२ - १९९२/९३ या वर्षात सादर केला.

४० मैलांचे परिसरात ज्युनिअर कॉलेज नसणे हे केवढ आश्चर्य. तथापि या कामात आम्हास यश आले नाही. आतातरी माझे एकेकाळचे मित्र ना. मधुकरराव पिचड, मंत्री आदिवासी विकास, यांनी लक्ष द्यावे, असे मला वाटते.

मात्र आंबेगणला जी इमारत मंडळाच्या कार्यालयासाठी बांधली त्या जागेचा उपयोग पोस्ट बेसिक आश्रम शाळेसाठी करावा असा माझा मोह झाला. मुख्याध्यापक श्री. गाजरे सर यांना तशी कल्पना दिली. त्यांनीही साथ केली. तथापि अध्यक्ष फारसे अनुकूल नव्हते. अध्यक्ष अनुकूल नसताना सेक्रेटरीमार्फत इतर सदस्यांमार्फत कसे काम करून घ्यावे, ही घटना मला काही नवीन नव्हती. एकदा कार्यकारिणी मिटींगमध्ये दोन्ही भावांमार्फत आणि दादासाहेब पोतनीस यांचेमार्फत राव मंजूर करून घेतला आणि आंबेगण सुळे येथील पोस्ट बेसिक आश्रमशाळा प्रस्ताव पण केला. यावर्षी राज्यात फक्त ५ पोस्ट बेसिक आश्रमशाळा मंजूर झाल्यात. त्यात आंबेगणची ठक्कर बाप्पा पोस्ट बेसिक आश्रम शाळाही आहे.

पुढील वर्षी सुळे येथेही पोस्ट बेसिक आश्रम शाळा मिळाली आणि अगदी तरूण शिक्षक ज्यांची दोन वर्षे झाली असेल, अशांना मुख्याध्यापकाची संधी मिळाली. आदिवीसींचा अनुशेष पूर्ण करणारी आणि योग्य संधी देणारी महाराष्ट्रातील एकमेव संस्था डांग सेवा मंडळ. डांगसेवा मंडळाच्या ३ वर्षांच्या काळात दोन पोस्ट बेसिक आश्रम शाळा संस्थेला मिळविण्यासाठी मी धडपड केली. तथापि जळे येथे मागासवर्गीय वसतीगृह काढावे म्हणून तेथील प्रायमरी शिक्षक श्री. चौधरी, प्रमुख गांवकऱ्यांसह मंडळाचे कार्यालयात चकरा मारीत असत. संस्थेचा व्याप वाढू नये याची काळजी विचारी संस्थांना घ्यावी लागतेच, तथापि काही विशिष्ट परिस्थिती निर्माण झाली की काम सुरू करावे लागते.

आमचे सहकारी श्री. मोहाडीकर यांचे संमतीने एकदा जळे येथे श्री. चौधरी गुरूजींच्या प्रायमरी शाळेत गेलो. ७ वी पर्यंतची शाळा, डोंगरी वस्ती; परंतु प्रसन्नता, स्वच्छता टापटीप, शांतता पाहून प्रभावित झालो. जळे येथे गेल्यावर वसतिगृहास जागा देणाऱ्या आदिवासींच्या घरी गेलो. संदर गृहस्थ पेठ येथे गेले होते. त्यांच्या पत्नीने चहाचा आग्रह केला आणि चुल पेटविली. चहाचे भांडे काढले आणि एक छोटीशी कटोरी घेऊन बाहेर आली. माझ्या लक्षात आले, मी लगेच प्रश्न केला की, कुठे निघालात तुम्ही? त्या आमच्या माईने आदराने सांगितले की, बकरीचे दूध काढून आणते. चहासाठी मात्र मी त्यांना लगेच रोखले. मी त्यांना सांगितले की, मला चहा हवा आहे. मी चहा घेतोच; परंतु दुधामुळे मला

ॲलर्जी होते म्हणून बिनदूधाचा चहा हवा" आहे. तिलाही समाधान वाटले. मी एक नव्हे दीड कप बिनदुधाचा, कमी साखरेचा चहा घेतला. तो मला काढ्याप्रमाणेच वाटला.

मात्र त्या गावाच्या आर्थिक परिस्थितीचा माझ्यावर परिणाम झाला. दारिद्र्य पाहून माझे मन द्रवले आणि या गावी वसतिगृह सुरू करण्याचे मी नियोजन केले. त्या वर्षात मी पे ते जळे तीन चकरा पायी या वयात मारल्या. पेच्या शिक्षकांनी चांगले सहकार्य केले आणि वसतिगृह स्थिर केले. आज व्यवस्थित चालू आहे. छोटीशी पणती अगदी पेच्या डोंगरात पेटविली. शिक्षण प्रसाराचा पाया रोवला आणि भाऊ नावरेकर यांचे स्मृति प्रित्यर्थ गोवर्धन येथे दादांसह आम्ही ज्यावेळी गेलो त्यावेळी या वर्षात केलेले चांगले कार्य याबाबत विषय देऊन विचार मांडावयास लावले. तेव्हा दादां समक्ष मी सांगितले की, या वर्षात मी बिनदुधाचा दीड कप चहा घेतला आणि जळे येथे विद्यार्थी वसतिगृह सुरू केले.

१९९० मध्ये डांग सेवा मंडळात प्रवेश करताना डांग सेवा मंडळाचे माध्यमिक शाळांचे अनुदान बंद झालेले होते. वार्षिक तपासणी हिशोब, आपसातील शिक्षक संस्थाचालक वाद यामुळे संस्था आर्थिक अडचणीत होती. याकामी डांग सेवा मंडळाचे सल्लागार श्री. भा. वि. जोशी लक्ष घालीत होते. भा. वि. जोशीसर, सानेगुरूजी शिक्षण प्रसारक मंजळाचे पदाधिकारी दीर्घकाळापासून आहे. त्यांचे संस्थेत मी दोन वर्षे मुख्याध्यापक म्हणून काम केलेले आहे. संस्थेत पुष्कळ वेळा आमचे मतभेद असावयाचे, तथापि माझ्यावर आणि माझ्या कुटुंबावर भा. वि. जोशी परिवाराने जेवढे प्रेम केले, संकटात मदत केली, आमचे कौटुंबिक प्रश्न सोडविले, माझे घरावर पडलेल्या दरोड्याचे प्रसंगी धावून आले तेवढे सहकार्य आम्हांस अजून कोणी केले नाही. मला "आदिवासी सेवक पुरस्कार" मिळाल्यावर भा. वि. जोशी यांना जेवढा आनंद झाला तेवढा आनंद मी कुठेच पाहिला नाही. त्यामुळे डांग सेवा मंडळाचे सुपरवायझरच्या खुर्चीवर बसल्यावर त्यांचे सहकार्य मी अधिक मिळविले आणि एके दिवशी अनुदान प्रश्नांवर आमचे शिष्ट मंडळ मे. शिक्षण उपसंचालक श्री. नगराळे साहेब यांचे पुढे गेले. याकामी शिक्षणाधिकारी अजित देशपांडे यांनीही चांगली मदत केली आणि नगराळेसाहेब यांचेकडे बोराडीचे अण्णासाहेब रणधीर बसलेले होते.

दादासाहेब बिडकर आणि रणधीर यांची मिठी मारून झालेली भेट म्हणजे ज्ञानेश्वर चागंदेव यांची भेटच. या घटनेमुळे श्री. नगराळेसाहेब यांच्या मनावर काय परिणाम झाला याचा उकल झाला नाही. मात्र या प्रभावामुळे त्यांनी आपले अधिकारात तीन वर्षात अनुदान मंजूर केले. भाई नगराळे साहेब यांचे सारखे देव माणसे भेटणे दुर्मिळच. डांग सेवा मंडळाचे माध्यमिक शाळांचे अनुदान नियमित सुरू झाले. याकामी श्री. भा. वि. जोशी यांची साथ चांगली मिळाली, एवढेच काय टिळक राष्ट्रीय विद्यालय खामगांव या संस्थेच्या अडचणींचे काळातही श्री. भा. वि. जोशी यांनी साथ केली आणि कलेक्टर भाई नगराळे यांचे चांगले सहकार्य मिळवून दिले.

मात्र जून-जुलै ९३ मध्ये माझ्या पत्नीची प्रकृती बिघडली. तिच्या आजाराची कल्पना फार थोड्यांना. हिप्टेरियाचे ॲटॅक येत होते. त्यामुळे

अनेक अडचणीतून मला जावे लागले. ही परिस्थिती आमचे मित्र मोहाडीकर यांना सांगितली; नव्हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिली आणि १ ऑगस्ट १९९३ साली १ महिना रजेचा अर्ज देऊन पत्नीसह जव्हारला निघून गेलो. डांग सेवा मंडळातील खुर्ची सोडावी लागली; परंतु डांग सेवा मंडळ सोडले नाही. डांग सेवा मंडळाचा मी आजीव सदस्य आहे. त्यामुळे आदिवासी सेवेचे कार्य माझे चालूच राहिले. महाराष्ट्र समाज सेवा संघातही या कार्याची मुहूर्तमेढ मीच राम गायटे, कुसुमताई यांचे सहकार्याने रोवली आहे आणि रचना नावाचे वलयामुळे या कार्यास भरघोस सहकार्य मिळत आहे. अडचण आहे जमिनीची. डांग सेवा मंडळाच्या किाणी जमिनी मिळविण्यात सहकार्य केले. त्या मिळाल्या. तथापि वासाळी येथील आदिवासी जागेअभावी काय होणार ? दादासाहेब बिडकर यांनी उद्घाटन केलेली वि्लराव पटवर्धन यांचे नावाने चालविली जाणारी ही शाळा, अनेकांचे सहकार्य मिळविणारी ही शाळा कशी स्थिर होते याचा विचार सर्वांना करावा लागणार आहे.

आश्रम शाळा जमीन-पाणी आणि सु-संस्कारयुक्त शिक्षण यांच्यामुळे स्थिरावते. विद्यार्थी मिळत असतात. जसे वळण द्यावे तसे वळत असतात. शिक्षणाचा अर्थच माजी शिक्षण संचालक चिपळूणकर यांनी म्हटल्याप्रमाणे आहे की, शिक्षण म्हणजे दळण-वळण नव्हे! ●●

---

(पृष्ठ २० वरून पुढे)

नावाच्या तरूण इंजिनिअराने सुरूवात केली आहे. त्याचे या कामाला मो सहकार्य व चालना मिळत असते.

वन भोजन म्हणजे फक्त खाण्या-पिण्याचा कार्यक्रम होत असतो असे नाही तर भोजनाच्या आधी समाज परिवर्तनाचा, सुधारण्याचा देखील विचार करण्यात येत असतो. गेल्या वर्षीच्या दृष्टीने यावर्षी झालेल्या कार्यक्रमाची आखणी करून कार्यक्रम घेण्यात येतो. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंजिनिअर प्रकाश गावित तर प्रमुख पाहुणे म्हणून आदिवासी साहित्यिक, संशोधक एकता परिषदेचे प्रमुख कार्यकर्ते विरसिंग पाडवी हे होते.

समाज उन्नतीच्या विविध विषयावर चर्चा करण्यात आली होती. गरीब विद्यार्थ्यांना पुस्तके, कपडे इ. अशाप्रकारे मदत केली जाते. भिल्ल पांडव परिषद वनऔषधीचा कसा विकास करता येईल याचा विचार विनिमय करण्यात आला होता. उपस्थितांमध्ये समाजातील सर्वच घटकातील प्रतिनिधी उपस्थित होते, काळआंबा गावचे सरपंच व पंचायत सदस्य बापू भवरे, उमरपाटा गावचे सरपंच, सोमा मावची व सदस्य, फुलजी टेलर, विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून भिवाजी राऊत, राणीलाल कुवर, बारसिंग रूध्या, वानसिंग बिलकूले इ. तसेच शिक्षक प्रतिनिधी म्हणून अविनाश मावची, मा. विद्यालय बसरावळ, आवश्या बिळकूले, जिल्हा परिषद शाळा मावची पाडा, गाव मांजरी, आर.जी.कुवर, जिल्हा परिषद शाळा कळंब, रायगड जिल्हा, सु.ने.कुवर, कर्जत, रायगड जिल्हा. मगन सावजी वळवी, शिक्षक बोकर सर ता. नवापूर इ. शिक्षक उपस्थित होते. त्याचप्रमाणे परिसरातील तरूण व इतर नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. अशा प्रकारे सुमारे, दीड-एकशे लोक वनभोजनाच्या कार्यक्रमाला उपस्थित होते. ●●

# अज्ञात समाजसेविका - कमलबाई

ज्योत्स्ना दिलीप पाटील

खानदेशात आदिवासी जमातींमध्ये 'भिल्ल' समाजाचे प्रमाण जास्त आहे. भिल्ल समाज गावाच्या वेशीवर किंवा गावाच्या एका टोकाला वस्ती करून राहतो. हा समाज जेथे वस्ती करून राहतो त्या ठिकाणाला 'भिलाटी' म्हणून संबोधले जाते. भिल्ल गावाबाहेर छोटीशी झोपडी बांधून राहतात. त्यांचा प्रमुख व्यवसाय म्हणजे शेतमजुरी करणे. गावातील शेतकऱ्यांच्या शेतात निंदणी, बेननी यांसारखी कामे करून त्या मजुरीवर गुजराण करायची.

भिलाटी म्हणजे हातभट्टीची दारू मिळण्याचे ठिकाण असेही समीकरण होय. प्रत्येक खेड्यात हातभट्टीची दारू मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे भिलाटी होय. भिल्ल समाजातील लहान मुले देखील ही दारू पित असतात. दारू हेच या लोकांचे अमृत होय असे त्यांना वाटते. लहानपणीच दारूच्या आहारी गेलेली भिल्लांची मुले इतर जगापासून अलग पडतात. गरिबी, व्यसन, उपासमार यांमुळे भिल्लांच्या मुलांना शिक्षण म्हणजे काय? हे ठाऊक नसते.

देशाच्या स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला; परंतु भिल्ल समाजापर्यंत शिक्षणाचे साधे वारेदेखील पोहोचू शकले नाही याची खंत वाटते. पंचवीस वर्षापूर्वी रूपचंद नावाच्या एका भिल्ल माणसाने त्याच्या तेजा नावाच्या मुलीला शाळेत घातले तेव्हा आमच्या कमलबाईंना खूप आनंद झाला. इतर मुले गैरहजर राहिली तर बाई त्यांना शिक्षा करायच्या; परंतु तेजा गैरहजर राहिली तर तिला शिक्षेत सूट मिळत असे. कारण तेजा कधी कधी आईवडिलांबरोबर शेतात कामाला जात असे त्यामुळे तिला शिक्षेत सूट मिळत असे. तेजा शाळेत आली नाही की आम्हा दोन मुलींना तिला बोलवण्याकरिता तिच्या घरी जावे लागे. तेजाचे घर म्हणजे छोटीशी झोपडी.

तेजा झोपडीबाहेरच इतर मुलांबरोबर गोट्या-गोट्या खेळत असे. बाईंनी बोलावले असे सांगताच ती नाखुशीने आमच्याबरोबर शाळेत येई. बाई तेजाला शिक्षा का करीत नाहीत? म्हणून आम्हा मुलांना बाईंचा खूप राग येत असे; परंतु जेव्हा मला कळू लागले तेव्हा बाईंविषयी खूप अभिमान वाटला.

बाईंनी तेजाला दिलेली वागणूक याविषयी मी जेव्हा जेव्हा विचार करते तेव्हा बाईंच्या दूरदृष्टीचे कौतुक वाटल्याशिवाय राहात नाही. संपूर्ण भिल्ल समाजातील एकच मुलगी शाळेत येते, याचाच अर्थ बाईंकडे हे एकच बी होते आणि हे बी जर व्यवस्थितपणे पेरले गेले नाही तर बाईंना काहीच मिळाले नसते. त्यामुळे बाईंना तेजा नावाचे बी अनमोल वाटत होते. बाई कुल्याही परिस्थितीत ते बी निकामी होऊ देणार नव्हत्या. तेजाला शाळेविषयी प्रेम वाटावे यासाठी त्या

*(पृष्ठ ३६ वर पहा)*

# आदिवासी एकता परिषदेचा
# होबाय यात्रा कार्यक्रम संपन्न

वीरसिंग पाडवी

ठरल्या प्रमाणे दिनांक १० जानेवारी २००१ बुधवारी संध्याकाळी सातपुडा पर्वतातील रम्य आणि थंड वातावरण असलेल्या देवगोवी (दाब) तालुका अक्कलकूवा जि. नंदूरबार याठिकाणी आदिवासी बांधव आपली परंपरागत कपडे वेश-भूषा करून नटून थटून मोचा संखेने एकत्र जमले होते. आपली हत्यारे आणि वाद्ये देखील सोबतीला आणलेली होती. सर्वात असली या गावाची होबाय यात्रा उावदार दिसत होती. होबाय यात्रेत आमदार के. सी. पाडवी यांचे वयोवृद्ध आई-वडील यांचा या यात्रेत प्रमुख सहभाग होता.

पुजारी मंडळी आप-आपल्या होबाय यात्रेची पूजाविधी करून आपल्या होबाय यात्रेतील लोकांना मार्गदर्शन करत होते तर, होवऱ्या मंडळी होवऱ्या झालेली माणसे आपआपले पारंपरिक भोपळ्याचे तंतुवाद्य घेऊन देव देवतांची कथा कहाणी सांगत होते. होबाय यात्रेतील लोकांना सांभाळून घेत होते. होवऱ्या म्हणजे सांभाळून घेणे, सावरून घेणे. याप्रमाणे सावरून घेत होते. हि दारी पातारी बाया आपआपल्या टोपलीत भातांचे दाणे (साळ) ह्या दाण्यांनाच पात म्हणतात. पात म्हणजे निमंत्रण याप्रमाणे भाताचे दाणे, दारूची बाटली, कोंबडी टोपलीत घेऊन मोठ्या संखेने बाया आल्या होत्या.

चिरख्या बनलेले लोक बांबूच्या कांबीपासून तयार केलेले चिर्ऽऽऽचिर्ऽऽऽ वाजणारे वाद्य घेऊन नाचत होते. आदिवासी बोलीभाषेप्रमाणे देवांचा जयघोष करीत होते.

देव मोगरा SSS डूर्रकोव

राजा पाना SSS डूर्रकोव

देव गोवी SSS डूर्रकोव

अशाप्रकारे विविध देवांच्या नावाने जयघोष करीत नाचत होते.

रात्री प्रमुख कार्यकर्त्यांचे होबाय यात्रा व आदिवासी संस्कृतीसंबंधी, गिरधर पाडवी, सी.के.पाडवी अक्कलकुवा, पंचायत सदस्य धनसिंग पाडवी, विरसिंग पाडवी, माजी आमदार नरेंद्र पाडवी, अक्राणीचे आमदार के.सी.पाडवी यांची भाषणे, मार्गदर्शने झाल्यानंतर होबाय यात्रेत आलेल्या होवऱ्या मंडळींचे कथाकथन संम्मेलन झाले. २०-२५ कथाकारांनी थोडक्यात आपल्या कलागुणांचा परिचय कथा सांगून करून दाखवला. त्यानंतर रात्रभर आदिवासी कलापथकाचा मंजू कर्मा पाडवी यांनी आदिवासीच्या जीवनावर सोंग सादर करून करमणूक केली.

दुसऱ्या दिवशी दिनांक ११ जानेवारी रोजी सकाळी देवगोवी स्थानकावरून पूजा करून, सामा महाराज हाडबावाले यांचा आशीर्वाद घेऊन सुमारे २०० लोक पुढच्या मार्गी लागले. वाजत गाजत नाचत जयघोष करीत सर्व लोक दोन-दोनच्या लायनीने पहाड उतरून आमलीबारी गावी येऊन विश्रांती घेतली. आमली बारी गावकऱ्यांनी सर्वांना चहा पाजला. तेथून पुन्हा वाटचाल करीत

अक्कलकुवा आले. तेथे माजी आमदार नरेंद्र पाडवीने सर्वांसाठी नास्त्याची सोय केली होती. सर्वांनी नाष्टा करून विश्रांती घेऊन सात्री सात-साडेसातपर्यंत चालत चालत खापर आले. तेथे गावकऱ्यांनी व परिसरातील लोकांनी प्रत्येक कुटुंबाकडून एक भाकरी व भाकरीबरोबर भाजीसाठी एक रूपया याप्रमाणे वर्गणी करून यात्रेतील लोकांसाठी जेवणाची व्यवस्था केली होती.

रात्री होबाय यात्रेचा उद्देश समजावून सांगण्यासाठी एक सभा झाली. त्यात सी.के.पाडवी, दरबारसिंग पाडवी, धाकू गुरूजी, भागा टेलर इ. ची भाषणे झाली. यानंतर रात्रभर सोंगाड्या पार्टीचा कलापथकाचा कार्यक्रम झाला. दिनांक १२ जानेवारीला खापर गावातून मिरवणूक काढून होबाय यात्रेला सुरुवात करण्यात आली. होबाय यात्रेचे आभार जगन्नाथ पाडवी गावकऱ्यांकडून मानले, तर होबाय यात्रेकडून वाहरू सोनावणे, वीरसिंग पाडवी यांनी आभार मानले व पुढे वाटचाल सुरू करण्यात आली.

पेचरी देव गावकऱ्यांनी चहापाण्याची व्यवस्था केली होती. चहा-पाणी घेतल्यावर सेलबा गाव गाून गावात मिरवणूक काढून गुजरात राज्यातून सागबारा गावावरून चोपड वाहव येथे मुक्काम केला. तेथे बहादूरसिंग वसावाने सर्व व्यवस्था केली होती. रात्री सभेचा आणि सांस्कृतिक कार्यक्रम झाला. सकाळी गावकऱ्यांचे आभार मानून देव मोगराकडे वाटचाल. रस्ता डोंगर दऱ्यांचा, चढ उताराचा असल्याने सर्व लोक थकले होते. दुपारी ४-५ वाजेपर्यंत सर्वांनी देव मोगरा स्थळ गाले. देवमोगरा ट्रस्टींनी सर्वांचे स्वागत करून उतरण्याची सोय करून दिली होती.

रात्री गोसा पेंटरने होबाय यात्रा दर्शन चित्र तयार केले होते, त्याचे फलक प्रदर्शन उद्‌घाटन आदिवासी कलाकार बाबूराव खोडदेकर, मंजू कर्मा पाडवी यांच्या हस्ते करण्यात येऊन होबाय यात्रेचे महत्व वाहरू सोनावणे, वीरसिंग पाडवी, सी. के. पाडवी ह्यांनी जमलेल्या लोकांना सांगितले आणि कलाकारांचा सत्कार करून सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरूवात करून रात्रभर कार्यक्रम झाला. सकाळी दिनांक १४ जानेवारीला देवमोगरा देवीचे दर्शन घेऊन सर्व होबाय यात्रेकरू पुन्हा आपल्या वाटेला लागले. आदिवासी एकता परिषदेच्या महासंमेलन स्थळाकडे दुपारी ४-५ वाजेपर्यंत सर्व लोक संमेलनात रेलवा भराडा येथे पोहोचले. संमेलनात होबाय यात्रेचे स्वागत करण्यात आले.

होबाय यात्रेच्या वतीने संमेलनात वाहरू सोनावणे यांनी आदिवासी एकता परिषदेचा उद्देश व वीरसिंग पाडवी यांनी आदिवासींचा इतिहास व संस्कृतीवर मार्गदर्शनात्मक भाषणे केली. जयंत पाडवी, दामू ठाकरे यांनी आदिवासींच्या जीवनावर गीते सादर केली. तेथेच यात्रेसंबंधी दरबारसिंग पाडवी, सी.के.पाडवी यांनी माहिती सांगितली. अशाप्रकारे होबाय यात्रा दिनांक १५ जानेवारी २००१ रोजी मंगळवारी आदिवासी एकता परिषदेच्या महासंमेलन बरोबरच समारोह करण्यात आला.

●●

वीरसिंग पाडवी
४४ सरस्वती निवास
मा. शिक्षक कॉलनी, नंदूरबार

# तळोदा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत १००% अनुदानावर
# वीजपंप संच पुरवठा योजनेचा संशोधनात्मक अभ्यास

प्रा. डॉ. एस. पी. गिरासे

आदिवासी विभागातर्फे आदिवासी क्षेत्राच्या विकासासाठी विविध प्रकारच्या योजना राबविल्या जातात. पहिल्या प्रकारातील योजना प्रामुख्याने व्यक्तिगत किंवा कौटुंबिक लाभाच्या योजना असून दुसऱ्या प्रकारातील योजना पायाभूत सोयी किंवा सुविधा निर्माण करण्यासाठी आहेत. या योजनांपैकी काही योजना आदिवासी विकास विभाग स्वतः राबविते तर इतर काही योजना शासनाच्या इतर विभागामार्फत आदिवासी उपयोजनेखाली राबविल्या जातात.

आदिवासी विकास विभागातर्फे राबविल्या जाणाऱ्या योजनेमध्ये प्रामुख्याने आदिवासींच्या शैक्षणिक विकासाच्या आणि आदिवासींना आर्थिक विकासाची संधी उपलब्ध करवून देणाऱ्या अशा दोन प्रकारच्या योजना आहेत. पहिल्या प्रकारात आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप किंवा तेलपंप पुरविण्याची योजना आहे.

आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासासाठी आदिवासी शेतकऱ्यांना वरदान ठरेल अशी १००% अनुदानावर वीजपंप उपलब्ध करवून देण्याची योजना आहे.

आदिवासींचा प्रमुख व्यवसाय शेती हा असून बहुसंख्य आदिवासी शेतकरी परंपरागत पद्धतीची शेती करतात. त्यांची शेती कोरडवाहू प्रकारची आहे. आणि पावसावर अवलंबून असणारी आहे. आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतीच्या परंपरागत पद्धतीत सुधारणा करणे आणि त्यांना स्वयंपूर्ण बनविण्यासाठी, त्यांचे पावसावरचे अवलंबन कमी करून शेतात सिंचनाची सोय उपलब्ध करवून देणे अशा विविध उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठीही आदिवासी शेतकऱ्याच्या आर्थिक विकासाला विशेष परिणामकारक ठरणारी योजना महाराष्ट्रात आदिवासी उपाययोजनेच्या कार्यक्षेत्रात २४, आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्पामार्फत १८ जिल्ह्यात आणि १११ तालुक्यात राबविली जात आहे.

नंदूरबार जिल्ह्यात आदिवासी उपाययोजनेच्या कार्यक्षेत्रात सदर योजना राबविण्यासाठी तळोदा आणि नंदूरबार हे दोन स्वतंत्र आदिवासी विकास प्रकल्प निर्माण केले आहेत. तळोदा आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रात तळोदा, अक्कलकुवा, अक्राणीमहल आणि शहादा या चार तालुक्यांचा समावेश होतो. तळोदा प्रकल्पामार्फत १९७३-७४ पासून सदर योजना राबविली जात आहे.

१९७३-७४ पासून ते १९९६-९७ पर्यंत एकूण २३ वर्षात या प्रकल्पामार्फत २६०४ आदिवासी शेतकऱ्यांना ३.२४.२५,६९७उ०० रूपयांच्या किंमतीचे वीजपंप संच पुरविण्यात आले आहेत.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्रतेची अटी**

१) आदिवासी शेतकऱ्यांची जमीन धारणा ६० आर (दीड एकर) पेक्षा कमी आणि ६.४० हेक्टरपेक्षा जास्त असू नये. ही मर्यादा घालून देण्याचा उद्देश असा आहे की - ६० आर पेक्षा कमी क्षेत्र असल्यास सिंचनाचा खर्च आर्थिकदृष्ट्या किफायतशीर होणार नाही. याउलट ६.४ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र असल्यास उपलब्ध करून देण्यात आलेली सिंचन क्षमता अपुरी पडेल. अर्थात पहिल्या बाबतीत दोन किंवा तीन शेतकरी एकत्रित येऊन त्यांचे एकत्रित क्षेत्र ६० आर पेक्षा जास्त असल्यास तर दुसऱ्या बाबतीत क्षेत्र जास्त असले तर लागवडीयोग्य क्षेत्र ६.४ हेक्टर या मर्यादेत असल्यास या योजनेचा लाभ देता येतो.

अर्जदार आदिवासी शेतकऱ्याकडे विहीर अथवा अन्य पाण्याचा उद्‌भव (Source) उपलब्ध असणे आवश्यक आहे. विहिरीस किमान सहा महिने (ऑगस्ट ते जानेवारी) या कालावधीत पुरेसे पाणी असणे आवश्यक आहे. पर्यायी उद्‌भवात नदी, नाले, तलाव यांचा समावेश करण्यात आला आहे.

आदिवासी शेतकऱ्याला विहीर किंवा नदीनाला या पाण्याच्या उद्‌भवामधून पाणी उपसून सिंचनाची सोय करण्यासाठी वीजपंप किंवा तेलपंप दिला जातो. अर्जदाराच्या शेतात किंवा परिसरात वीज पुरवा उपलब्ध असल्यास त्याला वीज पंप दिला जातो. अन्यथा ऑईल इंजिन म्हणजे तेलपंप दिला जातो. या योजनेसाठी लाभार्थी शेतकऱ्यांना एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे अर्ज करणे आवश्यक असते. अशा अर्जाच्या संदर्भात प्रकल्प अधिकाऱ्याने पुढील कागदपत्रांची पूर्तता करवून घ्यावयाची असते.

(अ) वीजपंपाकरता राज्य वीज मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेले सुसाध्यता (फिजिबिलीट) प्रमाणपत्र

(ब) भूजल सर्वेक्षण यंत्रणेने दिलेले शेतकऱ्याला पाण्याचा उद्‌भव (स्त्रोत) असल्यास संबंधित समक्ष अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र. येणेप्रमाणे पूर्तता झालेली सर्व प्रकरणे बळकटीकरण खालील ११ (अकरा) प्रकल्प क्षेत्रात निर्देश केलेल्या समितीसमोर मंजुरीसाठी ठेवावयाची असतात आणि मंजूर प्रकरणानुसार लाभार्थी शेतकऱ्यांना वीजपंप संच पुरवठा करावयाचे असतात.

तळोदा प्रकल्प कार्यालयामार्फत १९७३-९४, १९९६-९७ या २३ वर्षाच्या कालखंडात २६०४ आदिवासी शेतकऱ्यांना खालीलप्रमाणे वीजपंपांचा पुरवठा केला आहे. त्याची सविस्तर आकडेवारी प्रकल्प कार्यालयातील नोंदीवरून खालीलप्रमाणे दिसून येते.

एकूण पुरवठा केलेल्या २६०४ वीजपंप संचांपैकी २१३९ वीजपंपसंचांना वीजपुरवठा करण्यात येऊन ते कार्यान्वित करण्यात आले आहेत. तर ६४५ वीजपंप अद्याप कार्यान्वित नाहीत. २६०४ वीजपंपसंचांपैकी ६४५ वीजपंप संच अकार्यान्वित आहेत. म्हणजेच १७.८५% वीजपंप संच अकार्यान्वित असून त्यांचा लाभ आदिवासी लाभार्थीला मिळावयाला सुरुवात झालेली नाही. मंजूर केलेले वीजपंप त्वरेने बसविण्याबाबत तसेच त्यांना वीज पुरवठा करून देवून कार्यान्वित करण्याच्या संदर्भात आदिवासी विकास विभागीय

तक्ता क्रमांक १

| अ.न. | शेतजमीन धारक आदिवासी शेतकरी कुटुंबाचा तपशील | आकडेवारी |
|---|---|---|
| १. | ६० आर पेक्षा कमी शेतजमीन धारक शेतकऱ्यांची कुंटुंबाची संख्या | १४६४ |
| २. | ६० आर पेक्षा जास्त आणि १ हेक्टर पेक्षा कमी जमीन धारक | ४५४५ |
| ३. | १ हेक्टर ते २ हेक्टर दरम्यान जमीन धारक कुटुंबाची संख्या | १२२६३ |
| ४. | २ हेक्टर ते ४ हेक्टर पर्यंत शेतजमीन धारक कुटुंबाची संख्या | ११०१४ |
| ५. | ४ हेक्टर ते ६.४ हेक्टर पर्यंत शेतजमीन असणारी कुटुंबाची संख्या | २७२८ |
| ६. | ६.४ हेक्टर पेक्षा जास्त शेतजमीन धारक कुटुंबाची संख्या | १५९ |
| | एकुण - | ३२१७३ |

तक्ता क्रमांक २

| अ.नं. | तालुक्याचे नाव | पुरवठा केलेल्या पंपांची संख्या | वीज एकूण खर्च केलेली रक्कम | अकार्यान्वित वीजपंपांची संख्या | अकार्यान्वित वीजपंपांची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | तळोदा | ७८१ | ८४,७५,५७२ | ६६ | १२,७१,२१४ |
| २ | अक्कलकुवा | ७४६ | ९८,४६,९५६ | १४० | २५,३५,३५१ |
| ३ | अक्राणीमहल (धडगाव) | ६२१ | ७०,६६,१८२ | २९१ | १,०५,९२,५२१ |
| ४ | शहादा | ४५६ | ७६,६८,९१९ | १४८ | २५,९३,९४२ |
| | एकुण - | २,६०४ | ३,३०,५७,४२९ | ६४५ | १,६९,९३,०२८ |

तक्ता क्रमांक ३

| वर्ष | वीजपुरवठा नसल्यामुळे अकार्यान्वित वीज पंपांची संख्या | किती वर्षापासून वीज पंप लाभार्थी शेतकऱ्याकडे अकार्यान्वित स्थितीत आहेत | वाया गेलेले वीजपंप वर्ष |
|---|---|---|---|
| १९८९-९० | ०३ | ०८ | २४ |
| १९९०-९१ | १३ | ०७ | ९१ |
| १९९१-९२ | ०२ | ०६ | १२ |
| १९९२-९३ | ०४ | ०५ | २० |
| १९९३-९४ | ३२ | ०४ | १२८ |
| १९९४-९५ | १२४ | ०३ | ३७२ |
| १९९५-९६ | १२९ | ०२ | २५८ |
| १९९६-९७ | ३३८ | ०१ | ३३८ |
| एकुण | ६४५ | - | १२४३ |

यंत्रणा अपेक्षेइतकी यशस्वी झालेली नाही असे दिसून येते.

मंजूर करण्यात आलेले वीजपंप बसविणे आणि कार्यान्वित करणे या विषयाची स्थिती वर दर्शविल्याप्रमाणे आहे, तर एकूण मंजूर वीजपंप संचांची संख्या देखील गरजेच्या मानाने अत्यंत तोकडी असल्याने दिसून येते. आदिवासी शेतकऱ्याच्या शेती पद्धतीची सुधारणा व्हावी आणि सिंचन व्यवस्थेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन त्याला जीवनमान सुधारण्याची संधी निर्माण करवून देण्यात यावी या बाबीवर शासनाचा कटाक्ष असला तरी एकूण आदिवासी शेतकऱ्यांपैकी जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनेत दरवर्षी लाभ देण्याकडे आदिवासी विकास विभागाचे पुरेसे लक्षे गेलेले नाही असे दिसून येते.

तळोदा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत चारही तालुक्यात शेतीवर जगणारी आदिवासी कुटुंब संख्या ३२१७३ आहे. भूधारक आदिवासी कुटुंबाची आकडेवारी पुढील तक्त्याप्रमाणे तहसील कार्यालयांच्या नोंदीवरून दिसून येते.

मागे दिलेल्या आकडेवारीवरून दिसून येते की ६० आर पेक्षा जास्त आणि ६.४ हेक्टरपेक्षा कमी शेतजमीन असलेल्या आदिवासी शेतकरी कुटुंबांची संख्या ३०५५० आहे. १९७३-७४ ते १९९६-९७ या २३ वर्षांच्या कालावधीत फक्त २६०४ शेतकरी कुटुंबांनाच वीजपंप योजनेचा लाभ दिलेला आहे हे पाहता एकूण शेतकरी संख्येच्या जेमतेम ८% शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ दिलेला दिसून येतो. या सर्वच पात्र पाण्याचा स्त्रोत उपलब्ध नसेल आणि त्यातील फक्त ५०% शेतकऱ्यांना पाण्याचा स्त्रोत उपलब्ध असू शकेल असे गृहित धरले लाभ दिला म्हणजेच जेमतेम १७.०४ % काम केले आहे. बसविलेले वीजपंप लगेच कार्यान्वित करणे आणि भूधारक आदिवासी शेतकऱ्याची मोठी संख्या पाहता जास्तीत जास्त शेतकऱ्यांना समाविष्ट करवून घेण्याच्या कामी आदिवासी विकास विभागाची उदासीनता ठळकपणे दिसून येते. वीजपंप पुरवठ्याची ही योजना किती फलदायी आहे याचा पडताळा ज्या भागातील शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे आणि त्यांनी तिचा योग्य फायदा घेऊन आपली आर्थिक स्थिती सुधारली आहे, हे पाहिल्यानंतरच येऊ शकेल. नंदूरबार जिल्ह्यातील तळोदा, अक्कलकुवा, अक्राणीमहल आणि शहादा या चार तालुक्यात योजनेच्या यशस्वीतेची कितीतरी उदाहरणे दिसून येतील.

आदिवासी शेतकऱ्याच्या दृष्टीने ही योजना एवढी उपयुक्त आणि महत्त्वाची असताना ती राबविण्याच्या कामी आदिवासी विकास विभागाची यंत्रणा एवढी उदासीन का असावी? ही खरी तर चिंतेची बाब आहे. या उदासीनतेचे एक कारण विस्तार कार्यक्रमाचा अभाव हे आहे. शेती सुधारणेच्या कोणत्याही योजनेची यशस्वीता तिचा प्रचार प्रसार आणि स्वीकार कसा होतो, यावर अवलंबून असते. त्यासाठी विस्तार प्रयत्नांना (एक्स्टेंशन एफर्स) फार महत्व आहे.

वीजपंप योजना आणि तिच्या उपयुक्ततेविषयी विस्तार कार्यक्रमाद्वारे शेतकऱ्यांना महिती देणे आणि अर्ज घेऊन स्वतःच प्रकरणे तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. सर्व माहिती गोळा करताना शेतकऱ्यांचे नाव, त्याच्या जमिनीचे

क्षेत्र, त्याच्या जमिनीवरील किंवा त्याच्या शेतजमिनीच्या जवळपास असलेल्या पाण्याचा स्त्रोत तसेच जवळपास वीजेची उपलब्धता आहे किंवा नाही आणि शेतकऱ्यांना दरवर्षीचा शिरस्ता याची माहिती घेता येईल.

वरीलप्रमाणे माहिती गोळा केल्यानंतर प्रत्येक प्रकल्प अधिकाऱ्याजवळ पात्र शेतकऱ्यांची परिपूर्ण गाववार यादी उपलब्ध होईल. योग्य प्रकारे नियोजन केल्यास सर्व उपलब्ध कर्मचाऱ्याच्यामदतीने वरील प्रकारचे सर्वेक्षण एका महिन्याच्या कालावधीत निश्चितपणे पूर्ण करवून घेता येईल. यासाठी आश्रमशाळांच्या शिक्षकांचा उपयोग करून घ्यावयाचा असल्यामुळे साधारणपणे उन्हाळ्याची सुट्टी किंवा दीपावलीची सुट्टी हा कालावधी सर्वेक्षणासाठी निवड उचित ठरेल.

सर्वेक्षणांती गावनिहाय जी शेतकऱ्याची यादी तयार होईल त्या यादीमधील शेतकऱ्यांचे अर्ज स्वतः निरीक्षकांनी त्या गावाला भेट देऊन तयार करवून घेवून सर्व बाबींची पूर्तता करून प्रकल्प कार्यालयाला सादर करावेत आणि वीजपंप पाणी परवानगी, वीज मंडळाच्या बाबींची पूर्तता ही स्वतःच करावी.

प्रत्येक प्रकल्पाचे दरवर्षीचे वीजपंपाचे लक्ष्य (Target) वरील सूचना करण्यात आलेल्या सर्वेक्षणाच्या आकडेवारीवरून ठरविण्यात यावे, म्हणजे ते विशेष व्यवहार्य ठरेल. आदिवासी विकास विभागाची यंत्रणा अशा विस्ताराच्या कामी कमी पडते आहे आणि म्हणूनच एकूण आदिवासी शेतकऱ्यांपैकी जेमतेम १७.८५% शेतकऱ्यांना गेल्या २३ वर्षात या योजनेचा लाभ मिळवून देण्यात आदिवासी विभाग धन्यता मानीत आहे..

या योजनेची व्याप्ती वाढविण्यासाठी आणि दरवर्षी जास्तीत जास्त शेतकऱ्यांना योजनेत सहभागी करवून घेण्यासाठी व्यवस्थित नियोजन करण्याची गरज आहे, तसे झाल्यास आगामी ७ ते ८ वर्षात सर्व आदिवासी शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळवून देता येईल.

अ) आदिवासी शेकऱ्यांची जी आकडेवारी ढोबळ मनाने वर दिली आहे तिच्या अनुरोधाने प्रत्येक प्रकल्प कार्यालयाच्या आदिवासी उपयोजनेच्या क्षेत्रात आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर किती आदिवासी शेतकऱ्यांना फायदा दिला जाऊ शकतो याविषयी सर्वेक्षण करणे.

ब) असे सर्वेक्षण आदिवासी विकास निरीक्षक आणि दुर्गम भागात पसरलेल्या आश्रम शाळातील प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांच्या मदतीने करवून घेता येईल.

क) आदिवासी विकास निरीक्षक आणि आश्रम शाळेचे शिक्षक यांना प्रकल्प क्षेत्रातील एकूण गावांपैकी प्रत्येकी ५ ते १० गावे वाटून दिल्यास असे कर्मचारी त्यांच्याकडे देण्यात आलेल्या गावातील माहिती गोळा करतील आणि अशाप्रकारे सर्व प्रकल्प क्षेत्राची माहिती उपलब्ध होऊ शकेल.

जीवनधारा- योजनेखाली पंचायत समिती कार्यालयाकडून आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतावर विहिरी खणण्याचा कार्यक्रम घेतला जातो, ही आयती यादी प्रकल्प कार्यालयाला उपलब्ध होऊ शकते किंबहुना वर सुचविलेल्या सर्वेक्षणाची माहिती अंतिमरित्या उपलब्ध होईपर्यंत प्रकल्प कार्यालयाने जीवनधारा योजनेअंतर्गत या आदिवासी शेतकऱ्यांना शेतीवर वीजपंप योजनेचा फायदा

करून देण्याचे लक्ष्य समोर ठेवले तरी फार मोठे काम यासंदर्भात होईल.

शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करून जास्तीत जास्त संख्येने आदिवासी शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करण्याबरोबरच मंजूर केलेले वीजपंप वेळीच शेतकऱ्यांना शेतीवर बसविणे आणि ते कार्यान्वित करणे याकडेही तितकेच आस्थेने आणि कार्यक्षमतेने लक्ष देण्याची गरज आहे.

प्रकल्प कार्यालयाने वीजपंप मंजूर केल्यानंतर ते बसविण्याची आणि वीजपुरवा करून कार्यान्वित करण्याची संपूर्ण जबाबदारी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाकडे सोपविण्यात आली आहे. महामंडळाच्या कार्यपद्धतीनुसार या संपूर्ण कार्यवाहीत पुढील टप्प्यानुसार कार्य केले जाते.

१) वीजपंपाची सार्वत्रिक निविदाद्वारे खरेदी करणे

२) वीजपंप बसविण्यासी सार्वत्रिक निविदाद्वारे अभिकर्त्यांची नेमणूक करणे.

३) महामंडळाच्या यंत्रणेतील अधिकाऱ्यांकडून महाराष्ट्र राज्य वीजमंडळाच्या संबंधित अभिकर्त्यांकडे पाठपुरावा करून वीजपंपाला वीज पुरवठा उपलब्ध करून देणे.

वरील तिन्ही टप्प्यात महामंडळाच्या यंत्रणेकडून पाहिजे त्या वेगाने कार्यवाही केली जात नाही, तसेच समन्वय आणि पाठपुरावा यांच्या कामीही आदिवासी विकास महामंडळाची यंत्रणा कमी पडते, असे अनुभवास आले आहे. वीजपंप खरेदी आणि पंप बसविण्यासाठी अभिकर्त्यांची नेमणूक या दोन्ही बाबी वर्ष सुरू होण्याच्या आधीच महामंडळानेच निश्चित करण्याची आवश्यकता आहे. पंप बसविण्यासाठी फाउंडेशन घ्यावे लागते आणि वीजपंप बसविणारा अभिकर्ता वेळीच निश्चित करून मंजूर केलेले सर्व वीज पंप बसविण्यासाठी आवश्यक कार्यादेश त्याला देण्यात आले पाहिजेत आणि त्यांच्याकडून विशिष्ट कालमर्यादेत पंप बसवून घेण्याची कार्यवाही केली पाहिजे.

कित्येक वेळा वीज पुरवठा लवकर उपलब्ध होण्याची शक्यता नसते. अशावेळी शेतात उघड्यावर वीजपंप संच राहू देण्यात शेतकरी तयार होत नाहीत. न बसविलेल्या वीजपंपाच्या संख्येपैकी बरेच वीजपंप या एकाच कारणाने बसविण्यात आलेले नाहीत ही आकडेवारीवरून दिसून येत आहे. असे होऊ नये याकरिता पुरवठा करण्याचे प्रकरण लगोलग वीजमंडळाच्या संबंधित कार्यालयाकडे पाठविले पाहिजे आणि त्याचा पाठपुरावा केला पाहिजे.

वीजमंडळाकडून वेळीच वीजपुरवा केला जात नाही. त्याबाबतीत अडचणी अथवा दिरंगाई होते त्यालाही काही कारणे आहेत ती खालील प्रमाणे दिसून येतात.

अ) शेतकऱ्याचा रितसर अर्ज (नमुना अ) मंडळाकडे गेलेला नसतो

ब) नमुना अ मधील अर्जासोबत सातबाराचे उतारे, मंजुरी आदेशाची प्रत आणि इतर आवश्यक कागदपत्रे दिलेली नसतात. ते सर्व काम प्रवर्तक आणि प्रायोजक म्हणून आदिवासी विकास विभागाच्या यंत्रणेने (आदिवासी विकास महामंडळाने) करावयाचे असते.

क) शेतकऱ्यांच्या शेतावर वीजपंप संच बसविल्यानंतर त्याचा इलेक्ट्रीकल फिटींगचा चाचणी अहवाल अधिकृत ठेकेदाराकडून प्राप्त

करवून घेवून वीज मंडळाकडे सादर केला नाही, तर कित्येक वेळा अशा टेस्ट रिपोर्टची विहित सहा महिन्याची कालमर्यादा उलटून गेल्यावर तो सादर केला जातो. त्यामुळे नवीन टेस्ट रिपोर्टची आवश्यकता भासते आणि त्यामुळेच विलंब होतो टेस्ट रिपोर्ट पाहिल्यानंतर वीज मंडळ कोटेशन देते. त्याप्रमाणे रकमेचा भरणा केला जात नाही.

सर्व प्रक्रियेस उशीर झाल्यामुळे बरेचवेळा शेतकरी वीजपंप काढून ठेवतो आणि वीज मंडळाचे कर्मचारी जेव्हा वीजपुरवठा करण्यास जातात तेव्हा वीजपंप जागेवर आढळून येत नाही. असे प्रकार देखील निदर्शनास येतात.

वर नमूद केलेल्या कारणांच्या मागे प्रामुख्याने संबंधित यंत्रणेशी शेतकऱ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेल्या योजनेबाबत विशेष अनास्था दिसून येते.

प्रकल्प अधिकारी आणि प्रकल्प कार्यालये प्रलंबित वीजपंपाच्या संदर्भात वीजमंडळ आणि आदिवासी विकास महामंडळ यांच्या अधिकाऱ्यांबरोबर सातत्यपूर्वक पापुरावा करीत नाही. आदिवासी विकास महामंडळाची यंत्रणा या कामामुळे पुरेसे तसेच पुरेशा उच्च पातळीवर हवे तितके लक्ष देत नाही. आणि केवळ प्रादेशिक कार्यालयांत असलेल्या वीजतंत्रावरच सर्व बाकी सोपवून मोकळे होते. तर प्रारंभी वीजपंप मंजूर करतेवेळी सुसाह्यता प्रमाणपत्र दिल्यानंतर वीज मंडळाचे अधिकारी ऐनवेळी प्रकरण सुसाध्य नसल्याचा पवित्रा घेतात. या तिन्ही यंत्रणांच्या या अनास्थेमुळे आणि उदासीनतेमुळे गरीब आदिवासी शेतकऱ्याला अपेक्षित लाभांपासून वंचित राहावे लागते. गरजू आदिवासी शेतकरी प्रकल्प कार्यालयात किंवा आदिवासी विकास महामंडळाच्या कार्यालयात किंवा वीज महामंडळाच्या चौकशीसाठी गेला तर त्याला माणुसकीची वागणूक देखील दिली जात नाही, मग त्याचे म्हणणे ऐकून घेणे आणि अडचणी दूर करणे बाजूलाच राहिले. कित्येक वेळा अशा प्रकरणांना भ्रष्टाचाराची काळी किनार असल्याचे ऐकण्यास मिळते.

मोठ्या प्रमाणावर अकार्यान्वित राहिलेल्या वीजपंपाना पूर्ण करण्यासाठी पुढील प्रकारच्या उपाय योजना अंमलात आणण्यास दीर्घकाळ प्रलंबित राहिलेले वीजपंप कार्यान्वित होतील एवढे नव्हे तर भविष्यात वीजपंप बसविण्याचे अथवा वीजपुरवा द्यावयाचे राहिलेले आहेत असे दृश्य दिसणार नाही.

अ) प्रकल्प कार्यालय, आदिवासी विकास महामंडळाचे संबंधित प्रादेशिक किंवा उपप्रादेशिक कार्यालय, वीजमंडळाचे संबंधित कार्यकारी किंवा सहाय्यक अभियंता आणि लाभार्थी अर्जदार या चौघांचाही एकत्रित घनिष्ट समन्वय साधण्यात आला पाहिजे.

ब) वीजपंप कार्यान्वित करणे ही सामुदायिक जबाबदारी आहे. त्यामुळे चारही घटकांमध्ये परस्पर सामंजस्य आणण्यात यावे आणि कोठेही समजुतीचा घोटाळा किंवा संदिग्धपणा ठेवला जाऊ नये.

क) सर्व प्रलंबित वीजपंप कार्यान्वित करण्यासाठी प्रकल्प अधिकाऱ्यांनी प्रारंभीच्या काळात पाक्षिक आढावा घ्यावा. दर पंधरवड्याला प्रकल्प कार्यालयाची यंत्रणा, आदिवासी विकास महामंडळाची यंत्रणा, वीजमंडळाचे अधिकारी

आणि संबंधित लाभधारक यांची एकत्र आढावा बैक घ्यावी आणि अशा आढावा बैठकीत जी काही कार्यवाही करावयाची राहिली असल्याचे निदर्शनास येईल त्या विषयी विनिर्दिष्ट जबाबदारी सोपविण्यात यावी. विवक्षित कालावधीत ती पार पाडण्यात यावी. प्रसंगी ज्या आदिवासी लाभार्थीला आढावा बैकीत बोलविले जाईल त्याला न्यूक्लिअस बजेट मधून भाडे खर्च देण्याची तरतूद योजनेत यशस्वितेसाठी करण्यात यावी.

ड) काही ठिकाणी वीज पंप जळाला किंवा चोरीला गेला म्हणून वीजपुरवठा करण्यात उपलब्ध नाही असे प्रकार आढळून येतात. अशा प्रकरणांची योग्य ती शहानिशा करून ते तत्काळ निर्लेखित करण्याची तरतूद गरज आहे. तसे झाल्यास प्रलंबित पंपाचा वाढीव आकड्यातून काही वीजपंप कमी होतील. मात्र अशा निर्लेखनाच्या संदर्भात गहाळ होण्याबद्दलची जबाबदारी निदयीत करणे आणि प्रसंगी वसुलीची कार्यवाही करणे असे उपाय प्रकल्प अधिकाऱ्यांनी योजले पाहिजेत असे वाटते.

इ) काही वीजपंप अशा ठिकाणी असतात की जेथे वीज मंडळाने सुसाध्यता प्रमाणपत्र दिले असले तरी स्वतंत्र डी.पी. अभावी वीजपुरवठा करणे आता शक्य नाही अशी वेळ येते, त्यावेळी लाभार्थी शेतकऱ्यांना मंजूर केलेला वीजपंप परत घेऊन त्याऐवजी तेलपंप (ऑईल इंजिन) मंजूर करण्याची कार्यवाही देखील करण्यास हरकत नाही.

वीजपंप ताब्यात दिल्यापासून एक वर्षाच्या आत जर वीजपंपाला वीज पुरवठा कोणत्याही तांत्रिक आणि व्यावहारिक कारणाने करता आला नाही तर वर केलेली उपाययोजना निश्चितच उचित ठरेल. मात्र या प्रकारची कार्यवाही करताना लाभार्थी शेतकऱ्याला विश्वासात घेऊन केली तरच शेतकऱ्यांचा या योजनेवरील विश्वास कमी होणार नाही.

तात्पर्य असे की आदिवासी शेतकऱ्याला वीजपंप देण्याची योजना विविध घटकांची सामूहिक एकत्रित आणि समन्वित कार्यवाही करून राबवायची आहे आणि संबंधित घटकांची आपआपली भूमिका आणि जबाबदारी समजून घेऊन ती पार पाडली तर मोठ्या संख्येने वीजपंप बसविण्याची किंवा वीज पुरवठा करावयाचे राहिले आहेत अशी स्थिती निर्माण होणार नाही.

प्रकल्प कार्यालयामार्फत अनेक विविध आदिवासी कल्याणाच्या योजना राबविल्या जातात. त्या योजनेचे सर्वेक्षण, प्रचार, प्रसार, निरीक्षण आणि मूल्यमापन करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात एक स्वतंत्र निरीक्षण अधिकाऱ्याची नेमणूक केलेली आहे. परंतु एकाच अधिकाऱ्यावर सर्व प्रकारच्या योजनेचे काम सोपविल्यामुळे काम दर्जेदार आणि अपेक्षेप्रमाणे करणे मानवी क्षमतेच्या बाहेर आहे असे दिसून येते.

त्यामुळे आदिवासींच्या कल्याण आणि विकासाच्या दृष्टीने ज्या विविध योजनांवर दरवर्षी करोडो रूपयांची गुंतवणूक शासन करत आहे. त्यांची अंमलबजावणी परिणामकारक आणि फलदायी ठरविण्यासाठी प्रत्येक तालुक्याचा ठिकाणी वर्ग-२ अधिकारी, एक प्रशिक्षित निरीक्षक, एक वरीष्ठ लिपीक, दोन कनिष्ठ लिपीक, एक शिपाई आणि एक चौकीदार नेमून स्वतंत्र कार्यालय सुरू केले पाहिजे. अशा पद्धतीने प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र यंत्रणेमुळे विविध योजनेचे व्यवस्थापन,

प्रशासन, नियंत्रण आणि मूल्यमापन करणे विशेष सुलभ होईल. या यंत्रणेचे कामकाज गतीमान आणि परिणामकारक करता यावे यासाठी स्वतंत्र वाहनाची तरतूद करण्यात यावी.

या लेखाचा समारोप करण्यापूर्वी एका बाबीचा उल्लेख करणे आवश्यक आहे आणि ती म्हणजे आदिवासी लाभार्थी शेतकऱ्यांच्या शेतावर बसविलेले आणि कार्यान्वित झालेले वीजपंप कालांतराने बिघडतात आणि त्यांची दुरूस्ती करण्याची आवश्यकता असते. माफक प्रमाणात आदिवासींना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या हेतूने जर काही निवडक आदिवासी तरूणांना वीजपंप दुरूस्तीचे रीतसर प्रशिक्षण दिले तर ते या वीजपंपाच्या दुरूस्तीद्वारे रोजगार मिळवू शकतील.

प्रकल्प कार्यालयाने न्यूक्लिअस बजेट अंतर्गत अशा प्रकारची योजना राबविली तर ते वीजपंपधारक शेतकऱ्यांच्या तसेच बेरोजगार आदिवासी तरूणाच्या हिताचे रेल. या योजनेकडे प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास महामंडळ, वीजमंडळ, तसेच आदिवासी लाभार्थी शेतकरी या सर्व घटकांनी ही आदिवासींच्या हिताची आणि मोठ्या मोलाची योजना आहे या दृष्टीने पहिल्यास आणि त्यांचा त्वरित लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहिल्यास या योजनेचा हेतू सफल झाल्याशिवाय राहणार नाही.

●●

प्रा. डॉ. एस. पी. गिरासे
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
तळोदा ता. तळोदा जि. नंदुरबार
पिनकोड नं. ४२५४१३

(पृष्ठ २५ वरून पुढे)

हरप्रकारे प्रयत्न करीत होत्या. एका तेजाला ज्ञानाच्या दिपाने प्रज्वलित करून संपूर्ण भिल्ल समाजाला प्रकाशाची दिशा दाखविण्याचा प्रयत्न बाई मोठ्या शिताफीने करीत होत्या. तेजा जेमतेम गुणांनी पास झाली तरी बाईंना आनंद होत असे.

एक तेजा शिकली म्हणजे ती तिच्या समाजाला नक्कीच प्रकाशाच्या मार्गावर नेऊन सोडेल. बाईंनी तेजा नावाच्या अनमोल बी ला अतिशय हळुवारपणे रूजवले. त्याला योग्यप्रकारे खतपाणी घालून चौथीपर्यंतची पालवी फुटेपर्यंत जोपासले. पालवी फुटल्यावर त्याला मोकळ्या हवेत हायस्कूलच्या वातावरणात सोडून दिले, मुक्तपणे जगण्याकरिता.

तेजा रूपचंद नावाची ही माझी बालमैत्रिण पुढे किती शिकली ते ठाऊक नाही; परंतू तिने तिच्या मुलांना नक्कीच शिकविले असणार आणि तिच्या समाजातील मुलांनाही शिकण्यास प्रवृत्त केले असणार याची खात्री आहे. बाईंनी जोपासलेले रोपटे निश्चितच फुलाफळांनी बहरून ता मानेने समाजात उभे राहिले असेल असा विश्वास आहे.

भिल्ल समाजाकरिता कार्य करणारी संस्था माझ्या ऐकिवात नाही; परंतु कमलबाईंनी तळमळीने केलेला प्रयत्न हा भिल्ल समाजाकरिता मैलाचा दगड ठरला.

●●

सौ. ज्योत्स्ना दिलीप पाटील,
६, राजमती बिल्डिंग, पोकार कॉलनी, मेरी, नाशिक - ४

# पंचायत राज संस्था

## आव्हानांचा विचार

देशाची लोकशाही व्यवस्था व्यापक, सखोल व अर्थपूर्ण होण्यासाठी लोकशाहीचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य संघर्षापासून ग्रामस्वराज्य हे महत्त्वाचे राष्ट्रीय उद्दिष्ट समजले गेले होते. राज्यघटनेतील ४० व्या मार्गदर्शक सूत्रात स्थानिक स्वयंशासित घटक म्हणून ग्रामपंचायतींची रचना करण्याची जबाबदारी राज्यसरकारांवर टाकण्यात आली होती. समाजातील हितसंबंधियांचा विरोध व राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी गेल्या ५० वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था अपेक्षित कार्य करू शकल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

या पार्श्वभूमीवर ७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीने या संस्थांच्या बळकटीकरणासाठी पायाभूत सुविधा निर्माण केल्या. ग्रामसभा कार्यरत करणे, महिला, दलित व वंचितांना आरक्षणाची तरतूद अशा घटनादुरूस्तीतील तरतुदी पुरोगामी स्वरूपाच्या आहेत. घटनादुरूस्तीमुळे पंचायतराज संस्थेला घटनात्मक अधिष्ठान मिळाले. त्यामुळे लोकांत उत्साह, आशा निर्माण झाली; परंतु शासनाने घटनादुरूस्तीच्या उद्दिष्टांकडे दुर्लक्ष केले. संविधानातील महत्त्वाच्या तरतुदींचे पालन करण्यास टाळाटाळ केली. दैनंदिन प्रशासनात या संस्थेची उपेक्षा केली. इतकेच नाही, तर काही बाबतीत प्रतिगामी पावले उचलली. त्यामुळे लोकांना मिळालेल्या घटनात्मक लोकशाही अधिकारांचा ऱ्हास झाला. दुर्दैवाने लोकांत आपल्या अधिकारांची जाणीव नसल्याने व ही जाणीव निर्माण व्हावी यासाठी आग्रहाने बाजू मांडणारे, प्रसंगी विरोध करणारे सबळ लोक-आंदोलन नसल्याने शासनाला लोकांच्या या मोलाच्या लोकशाही अधिकारांचे अधिक्षेप करणे शक्य झाले.

देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने इतर मुद्यांबरोबरच लोकशाही विकेंद्रीकरणाच्या महत्त्वपूर्ण मुद्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. याबाबतीत राजकीय पक्षांनी आपली भूमिका स्पष्ट करून निर्धाराने कृती करण्याची ग्वाही देण्याची आवश्यकता आहे. राजकीय पक्षांनी आपल्या निवडणुका जाहीरनाम्यात हे करावे, अशी आग्रहाची मागणी करणे आवश्यक आहे. सार्वत्रिक निवडणूक हे जनजागृतीचे साधन असून या निमित्ताने लोकशाही विकेन्द्रीकरणाची निश्चित कल्पना आणि लोकांच्या घटनात्मक अधिकारांची जाणीव करून देता येईल. लोकजागृती, लोकसहभाग व लोक आंदोलनाने घटनेतील तरतुदींचे प्रत्यक्ष व अर्थपूर्ण पालन करण्यास लोकमताचे दडपण उभे करता येईल.

### शासनाचे तिसरे स्तर निश्चित कालावधीत

भारतीय राज्यघटनेत केंद्र व राज्यशासनात अधिकारांची विभागणी होऊन द्विस्तरीय संघराज्याची व्यवस्था असली तरी घटनेतील उद्दिष्ट व मार्गदर्शक सूत्रांत सत्तेचे विकेन्द्रीकरण अभिप्रेत आहे. घटनेतील व्यवस्थे नुसार राज्य सरकारांवर

स्थानिक स्वराज्य संस्थांचे संवर्धन व संरक्षण करण्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे. ७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेचे कार्यक्षेत्र निश्चित करून शासनाचे तिसरे स्तर निर्माण करण्याच्या दिशेने पावले उचलली गेली आहेत.

या परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थेचे तिसरे स्वयत्त व स्वतंत्र स्तर स्थापन करण्याच्या दृष्टीने शासनाने त्याची संकल्पना (कोणतीही संदिग्धता राहू नये म्हणून) निश्चित करावी तसेच त्याच्या कार्यवाहीचा निश्चित कालावधीत कार्यक्रम जाहीर करावा.

## सत्तेच्या विकेन्द्रीकरणाची स्पष्ट व्याख्या

७३ व्या घटनादुरूस्तीत कलम २४३ (जी) च्या अंतर्गत स्थानिक विकास आणि सामाजिक न्यायाच्या विषयांबाबत राज्य विधान मंडळाला वाटल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार सुपूर्द करण्याची तरतूद आहे. कायद्यातील भाषा राज्य सरकारच्या मर्जीवर हे विषय सुपुर्द करण्याची असली तरी घटनादुरूस्तीचा एकूण आशय लक्षात घेता राज्य सरकारांवर तसे करणे बंधनकारक आहे. राज्य सरकारने मात्र याबाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार देण्यास टाळाटाळ केली आहे असा अनुभव आहे.

घटनेतील आशयाची योग्य दखल न घेता सोयीस्कर अर्थ लावून केवळ काही अधिकारच दिले गेले आहेत. कलम २४३ (जी) मध्ये devolution आणि endowment of power असे शब्द वापरण्यात आले असून त्यातून विकेंद्रीकरणाची संकल्पना स्पष्ट होत आहे.

सत्तेच्या विकेंद्रीकरणात खालील निकष अभिप्रेत असून त्यांची स्पष्ट व्याख्या होणे आवश्यक आहे.

अ) स्थानिक क्षेत्राच्या विषयांच्या बाबतीत निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचा व अग्रक्रम ठरविण्याचा अधिकार

ब) वैधानिक प्रातिनिधिक संस्था म्हणून तिला समांतर इतर शासकीय संस्था नसाव्यात. आपल्या क्षेत्रात ती एकमेव वैधानिक संस्था असावी.

क) राज्यांची अनुगामी संस्था म्हणून राज्यांचे उर्वरित अधिकार या संस्थेला असले पाहिजेत.

याचा विचार करता सध्या काही राज्यात असलेल्या

**DPDC** (डिस्ट्रिक्ट प्लॅनिंग डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन - जिल्हा नियोजन व विकास मंडळ),

**DRDA** (डिस्ट्रिक्ट रूरल डेव्हलपमेंट एजन्सी - जिल्हा ग्रामीण विकास संस्था) सारख्या संस्था विसर्जित करून त्यांचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यावे लागतील. तसेच सध्या आमदार आणि खासदार निधीतून स्थानिक विकासाची कामे केली जातात ती बंद करावी लागतील.

राज्य सरकारने आपले सध्याचे अधिकार कमी करून स्थानिक स्वराज्य संस्थेला दिले तरच सत्तेचे विकेंद्रीकरण होऊ शकते. कलम २४३ (जी) नुसार वरील निकषांना धरून निश्चित कालावधीत विकेंद्रीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाली पाहिजे.

## स्थानिक क्षेत्र व एकात्मिक त्रिस्तरीय व्यवस्था

स्थानिक स्वराज्य संस्थेचे तिसरे स्तर निर्माण करण्याकरिता "स्थानिक क्षेत्र" व "राज्य क्षेत्र" असे कार्यक्षेत्र निश्चित केले पाहिजे. ग्रामपंचायत ही जरी पायाभूत संस्था असली तरी तिची क्षमता तसेच अधिकारांचे योग्य वाटप यांचा विचार करता ग्रामपंचायत, तालुका आणि जिल्हा यांचे एकात्मिक स्थानिक क्षेत्र असले पाहिजे.

ग्रामपंचायतीच्या वरील स्तर राज्यांच्या परिस्थितीनुरूप "मंडल पंचायत", "पंचायत समिती" किंवा "जिल्हा परिषद" असले पाहिजे. या सर्व स्तरांवरील संस्था परस्परांवर अवलंबून व एकात्मिक असल्या पाहिजेत, तसेच त्यांचा संघटनात्मक दुवा बळकट असला पाहिजे. ग्रामपंचायतींच्या निवडणुका प्रत्यक्ष मतदान पद्धतीने व्हाव्यात, मात्र वरील स्तरांवरील संस्थांचे प्रतिनिधी ग्रामपंचायतींच्या अप्रत्यक्ष मतदानाने निवडले जावेत. त्रिस्तरीय व्यवस्थेला एकात्मिक स्वरूप लाभण्यासाठी शासनाने एकच कायदा केला पाहिजे.

## स्थानिक क्षेत्रात प्रातिनिधिक नियोजन समिती

भारताने स्वीकारलेल्या नियोजन पद्धतीच्या अर्थव्यवस्थेत नियोजनाचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थेकडे असले पाहिजेत. त्यांत नियोजन, त्यांची कार्यवाही आणि मूल्यमापन अभिप्रेत असावे. घटनादुरूस्तीतील कलम २४३ (ZD) अंतर्गत राज्य सरकारने चार पंचमांशापेक्षा कमी नाहीत इतके पंचायत राज्य संस्था, नगर परिषदा, नगर पालिका यांचे प्रतिनिधी असलेली जिल्हा नियोजन समिती एका वर्षाच्या आत स्थापन करावयाची होती. महाराष्ट्र राज्याने याबाबतीत केलेली दिरंगाई ही वरील कलमाच्या आशयाविरूद्ध असलेली कृती म्हणावी लागेल.

जिल्हा नियोजन समिती ही राज्य क्षेत्रापासून स्वतंत्र अशी वैधानिक समिती आहे. तिचे अध्यक्ष पालक मंत्र्यांना करणे, समितीची कार्यकारी समिती व पोट समिती नेमण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवणे, आमदारांना कायम निमंत्रित करण्याची तरतूद यांसारख्या शासनाने केलेल्या तरतुदी प्रतिगामी स्वरूपाच्या आहेत. जिल्हा नियोजन समित्यांची स्थापना घटनेतील मूळ उद्दिष्ट व आशय लक्षात घेऊन व्हायला पाहिजे व त्या स्थानिक स्वराज्य क्षेत्रांत स्वायत्त असल्या पाहिजेत.

## स्वतंत्र अधिकारी व कर्मचारी यंत्रणा

स्थानिक स्वराज्य संस्थेची अधिकारी व कर्मचारी यंत्रणा स्वतंत्र असणे आवश्यक आहे. राज्य सरकारने यात कोणताच हस्तक्षेप करू नये. सध्या ही यंत्रणा वृत्तीने व कृतीने 'उसनवार' आहे. राज्याच्या मुख्य सचिवांपासून ते ग्रामसेवकांपर्यंत महसुली यंत्रणेचे जाळेच आज अस्तित्वात आहे. त्यात नोकरशाहीचे सर्वच दोष आढळतात. ग्रामसेवक हा गटविकास अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियंत्रणात आणि शिस्तीत असतो. पंचायतीच्या चेकवर सही करण्याचा अधिकार त्याला कायद्याने दिलेला आहे.

गटविकास अधिकारी ग्रामसेवकांना कामे नेमून देतात, त्यांची माहिती सरपंचांना नसते.

त्यामुळे सरपंच अनुभवी व कार्यक्षम नसल्यास ग्रामसेवकच अधिकार वापरतात. लोकप्रतिनिधींच्या अधिकाराला काही अर्थच राहात नाही. सामाजिक व विधायक दृष्टी असलेली प्रशिक्षित स्वतंत्र कर्मचारी यंत्रणा तयार करणे आवश्यक आहे. तोवर वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांना सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने लोकसहभागातून लोकनेतृत्व निर्माण होईल, अशा जाणीवेने कार्य करण्यास सूचना देणे आवश्यक आहे.

### ग्रामसभा - पंचायतराज्याचा पाया

ग्रामसभा हे केवळ निर्णय प्रक्रियेतच नव्हे तर प्रत्यक्ष कृतीत सर्व नागरिकांना सहभागी करून घेण्याचे साधन आहे. लोकशाही व्यवस्थेतील काही उणीवा दूर करण्यास ग्रामसभा महत्त्वाची भूमिका पार पाडू शकते. यादृष्टीने ७३ व्या घटनादुरूस्तीत ग्रामसभेची तरतूद करून सत्तेच्या विकेंद्रीकरणाला नवे परिमाणच प्राप्त झाले आहे.

ग्रामसभेचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीतून पटवून देऊन, तिला अधिक अधिकार देऊन अर्थपूर्ण कार्य करण्यास प्रवृत्त करणे हे लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे आव्हान आहे.

पंचायतराज्य हा लोकांना शक्ती प्रदान करणारा, मूलभूत सामाजिक परिवर्तनाला चालना देणारा उपक्रम आहे. यांत तरूण, महिला, पुरोगामी विचारांच्या लोकांना ग्रामसभेच्या माध्यमातून कार्य करता येईल. ग्रामसभेला प्रभावी करण्याकरिता सरकारने दैनंदिन प्रशासनात तिचा शक्यतो उपयोग केला पाहिजे. राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्था यांनी ग्रामसभेला लोकांच्या जीवनातील महत्त्वाचे अंग म्हणून स्थान प्राप्त करून देण्याकरिता प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी निष्पूर्वक, समर्पित वृत्तीने काम करण्याची ग्वाही दिली पाहिजे.

### आदिवासी क्षेत्राला ७३ वी घटनादुरूस्ती

आदिवासी जीवन, संस्कृतीचे रक्षण व्हावे, त्यांचे शोषण होऊ नये म्हणून घटनेत दक्षता घेण्यात आली आहे. देशाच्या ईशान्य भागातील राज्यात प्रगत स्वरूपाचे पंचायत राज्य परंपरागतरित्या अस्तित्वात असल्यामुळे या राज्यांना (ही राज्ये परिशिष्ट सहामध्ये मोडतात) ७३ वी घटनादुरूस्ती लागू होणार नाही अशी स्पष्ट तरतूद कलम २४३ (M) नुसार केली.

या भागाव्यतिरिक्त देशातील इतर राज्यात परिशिष्ट पाचखाली आदिवासी क्षेत्र म्हणून जाहीर झालेला भाग आहे. या भागासाठी ७३ व्या घटनादुरूस्तीनुसार लोकसभेने १९९६ साली आदिवासी स्वयंशासनाचा कायदा केला. केंद्राच्या या कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाने डिसेंबर ९७ मध्ये आपल्या सर्व संबंधित कायद्यात सुधारणा करून स्वयंशासनाचा कायदा केला आहे. ह्या कायद्यातील अधिकारांचा वापर प्रत्यक्षात त्वरीत व्हावा यासाठी प्रशासकीय व्यवस्था करण्याची गरज आहे.

आदिवासी क्षेत्रात ग्रामसभेला स्थानिक नैसर्गिक संसाधनांबद्दल सल्ला देण्याचे, लाभार्थींची यादी निवडण्याचे, विकास कामांच्या पूर्ततेचा

*(पृष्ठ ४८ वर पहा)*

कथा

# मोठी माय

रंजना कान्हेरे

सुपर्णी पाण्यात पडलेल्या आपल्या प्रतिबिंबाकडे पाहण्यात गर्क होती. नदीवर आलं की तिचा हा नेहमीचा आवडता खेळ होता. नदीचे पात्र जिथे वळते, तिथे हा मोठा डोह होता. काठावरच्या एका विस्तीर्ण वृक्षाची एक फांदी डोहावर आडवी पसरली होती. फांदीवर आडवे पडले की खालच्या डोहात डोकावून आपले प्रतिबिंब पाहता यायचे.

आज पाण्यात पाहता पाहता सुपर्णीला एक नवीनच शोध लागला. ती आणखीनच निरखून पाहू लागली. अरे, माझ्या चेहऱ्यात आणि मोठी मायच्या चेहऱ्यात काहीतरी सारखेपणा आहे. काय तो समजत नाही......... पण आहे खरा. म्हणजे मोठी झाल्यावर मी मोठ्या मायसारखी दिसणार तर....!

मोठी माय बद्दलचा तिचा अभिमान उफाळून आला. मोठी माय बरोबर असली की कशा कशाची भीती वाटत नाही. .......तशी या नदीकाठी, नदीच्या प्रवाहात खेळतानाही कसलीच भीती वाटत नाही. मोठ्या मोयनेत एकदा सांगितले होते, नदी, धरती आणि माय या सारख्याच असतात. नदी तुम्हाला पाणी पुरवण्यासाठी धावत येते, धरती तुमच्या खाण्याची सोय करते, अन्नधान्ये, फळे-फुले पिकवते आणि माय जन्माला घालण्यापासून जाणते होईपर्यंत देखभाल करते! मोठी माय तर आख्या टोळीची माय आहे. ती टोळीतील लहानथोर सर्वांचीच देखभाल करते. कुणाला काही दुखलेलं- खुपलेलं तिला बरोबर कळतं.

"सुपर्णी, ओ सुपर्णी..........."

मोठ्या मायचा आवाज कानी येताच सुपर्णी दचकली. काही वेळातच अंधार पडणार हे तिच्या लक्षात आलं. असं कसं झालं आपल्याला
कळलंच नाही!

टोळीतील लहान मुलं हुंदडत इकडे तिकडे भटकतात. म्हणून अंधाराच्या आत त्यांना रोज शोधून वस्तीवर घेऊन जावं लागतं. शिकारीला न जाणाऱ्या काही लोकांचे ते रोजचे कामच आहे. आपल्याला असा वेळ झाला की मात्र मोठी माय स्वतःच शोधायला निघते. मोठ्या मायला आपल्यामुळे इथवर यावं लागतं याचं तिला एकीकडे वाईट, दुसरीकडे स्वतःबद्दल थोडा गर्वही वाटला.

झाडावरून माकडाप्रमाणे उड्या मारत ती खाली उतरली आणि धावत जाऊन मोठ्या मायला बिलगली.

"मला वाटलंच, तू इथंच सापडशील म्हणून; चल लवकर, अंधारून आलंय बघ केवढं!" मोठ्या मायने तिचा हात पकडून झपाझप पावलं टाकायला सुरूवात केली.

दोघी वस्तीवर पोचल्या. शिकारीला

गेलेले लोकही परतत होते. त्यांच्यातील दोन-चार जण "मोठी माय वो" अशा हाका मारत जवळ आले. त्यांच्यात लहानूही होता. त्याने बोलायला सुरूवात केली व "मोठी माय, आपल्या जंगलात परत ते भगत लोक घुसले आहेत."
इतरांचेही लक्ष होतेच, हे ऐकताच बरेच जण संतापाने उठून उभे राहिले. मोठ्या मायने सर्वांना शांत करत म्हटलं, "आता अंधारून आलंय, सर्वजण झोपा, उद्या सकाळी पाहू काय करायचं ते."

"मोठी माय, यावेळी मोठाच धोका आहे आपल्याला. त्यांच्यासोबत कमानी आणि तीर घेतलेले वीरही आहेत."

मोठी मायच्या कपाळावर बारीक आणी स्पष्ट उमटली, ती रागावली की नेहमीच उमटते तशी.

आपल्या जंगलावर आक्रमण झाल्यामुळे सर्वच संतापले होते. पण दिवसभराच्या धावपळीमुळे थकलेही होते. अंधारात काही करणे शक्यही नव्हते. लवकर उठून सर्वांनी मिळून काय करायचे ते ठरवू असे बहुतेकांचे मत पडले.

सर्व झोपले तरी मोठी मायच्या डोळ्याला डोळा लागेना. अंधारातच डोळे सताड उघडे ठेवून ती आठवू लागली. त्या लोकांच्या आपल्या जंगलावरच्या आक्रमणाची ही कितवी वेळ? पाचवी का सहावी........कोणी जाणे? पण हाकलून लावले तरी हे भगत लोक पुन्हा पुन्हा आपल्या जंगलाकडेच का वळताहेत? त्यांच्या पहिल्या आक्रमणाची आठवण तिला झाली.

त्या दिवशीही शिकारीवर जायचे ठरले होते. तरूण-प्रौढ, बाया-पुरूष सर्व तयार होत होते. प्रत्येकजण आपल्या हातांनी बनवलेली दगडाची हत्यारे तपासत, परजत होते. लहान मुले, म्हातारी माणसे मात्र नेहमीच वस्तीवर राहतात आणि त्यांच्या संरक्षणासाठी काही बाया व पुरूष मागे राहणार होते.

शिकारीला जाणाऱ्यांनी कोणत्या दिशेला शिकार मिळेल याबद्दल विचार केला आणि त्याप्रमाणेच टोळ्या करून ते सर्व विभागून पांगले.

संध्याकाळी शिकारीबरोबरच गोमतीने बातमी आणली की, त्यांच्या टोळीला युद्धच करावे लागले. ते शिकारीसाठी दूरवर गेले. वाटेत त्यांना दिसले की तलम वस्त्रे नेसलेले काही जटाधारी भगत अग्नी पेटवून मोठमोठ्या प्रार्थना म्हणत पूजा करत होते. त्यांच्या आसपास काही शस्त्रधारी लोक होते. थोड्याशा अंतरावर काही लोक जंगल तोडण्याचे काम करत होते. जंगलाचा बराच भाग तोडून त्यांनी साफ केला होता. आपल्या जंगलाच्या हद्दीत शिरलेली ही माणसे पाहून गोमतीची टोळी थबकली. काय करावे याचा विचार करू लागली. एवढ्यात त्या शस्त्रधारी लोकांनी त्यांच्यावर हल्लाच केला. त्यांच्याकडे जास्त धारदार पात्यांची शस्त्रे होती.

गोमतीच्या टोळीकडील दगडी हत्यारांनी त्यापूढे टिकाव धरला नाही. त्यांना जखमी अवस्थेत पळ काढावा लागला.

पण दुसऱ्याच दिवशी सर्व टोळीने एकत्रित जाऊन त्या घुसकोलांवर हल्ला केला. शर्थीने लढून त्यांना जंगलाबाहेर पळवून लावले.

पण ही गोष्ट तिथेच संपली नाही. ते पुन्हा पुन्हा येतच राहिले आणि त्यांना जंगलाबेहर हाकलण्याचे काम नेहमीचेच होऊन बसले.

असेच तिसऱ्या का चौथ्या वेळी त्यांच्याशी लढाई करून परत आल्यावर गोमती आश्चर्याने म्हणाली, "मोठी माय, मला एका गोष्टीचं मात्र अजून कळत नाही. अग, दरवेळई फक्त पुरूषच तेवढे येतात. एकही बाई येत नाही. भगतही पुरूषच, लढायला आलेले शस्त्रधारीही पुरूषच, अन्नधान्य, इतर सामान वाहून आणणारेही पुरूषच आणि जंगल तोडणारेही पुरूषच. त्यांच्याबरोबर बाया कशा येत नाहीत?"

मोठी माय उत्तरली, "हो, खरं आहे. त्यांच्या टोळीत बाया घराबाहेरच्या कारभारात भाग घेऊ शकत नाहीत. पुरूषांनाच फक्त बाहेरच्या समाजात वावरण्याचा हक्क आहे. बाया घरामध्येच राहतात. बायांवरच नव्हे तर, धरतीवरही ते आपली मालकी गाजवतात. धरतीवरचे जंगल तोडून, तिला आपल्याला हवं तेच धान्य उपजायला लावतात. मला पूर्वी दुर्गामायने हे सांगितलं तेव्हा पहिल्यांदा मलाही ते खरं वाटलं नव्हतं."

"मलाही कळत नाही पोरी, जन्माला आल्यापासून ते म्हातारं कुशीत होऊन मरेपर्यंत, छोट्या-मोठ्या सर्वच स्त्री-पुरूषांची घरात व बाहेर, सगळीकडे एकत्र वाढणं ही अतिशय नैसर्गिक गोष्ट आहे. लोक निसर्गाच्या विरूद्ध वागायला लागले तर नैसर्गिक प्रकृती ऐवजी विकृतीच जास्त फोफावेल. एवढंच मला कळतं पोरी, तू लहान असलीस तरी तुझी समज खूप चांगली आहे. माझं बोलणं लक्षात ठेव. आणि पुढे तू मोठी माय होशील त्यावेळी तुही या नैसर्गिक वाढीला जप ! अग, या आक्रमण करणाऱ्या लोकांचं जगच वेगळं आहे. आपण त्यापासून जितकं लांब राहू, तितकं आपल्या टोळीला या विकृतीपासून वाचवू शकू."

पण माय, लांब राहण्यापेक्षा त्यांच्याशी दोस्ती करू शकलो, एकमेकाशी बोलून एकमेकांच्या चांगल्या गोष्टी घेऊ शकलो तर......... त्यातून वाईट गोष्टींना, विकृतीला आळा नाही का बसणार?

मोठ्या मायने काहीसे हसत तिच्याकडे पाहिले. "तुझं मन किती भाबडं आहे पोरी! दोन टोळ्यांनी एकमेकांशी बोलून एकमेकांना सुधारयचा विचार केला तर.... त्यापरती आनंदाची गोष्ट दुसरी नाही. पण हा विचार दोन्ही बाजूंना सुचायला हवा, पटायला हवा! ती वेळ येईपर्यंत किती पिढ्या युद्धात नष्ट होतील कोण जाणे! स्वतःच्या, स्वतःच्या

टोळीच्या चुका समजणं, त्या कबूल करणं आणि सर्वांनी मिळून त्या सुधारण्यासाठी प्रयत्न करणं अतिशय कठीण गोष्ट आहे ही ! आणि आपल्या टोळीची ताकद तर किती करी कमी. स्वतःला या आक्रमाणापासून वाचवणं आपल्या हातात आहे!"

मोठ्या मायच्या डोळ्यापुढून सर्व प्रसंग झरझर पुढे सरकत होते. या शेवटच्या आठवणींबरोबर मायची नजर शेजारी झोपलेल्या सुपर्णीकडे वळली.

सुपर्णी गाढ झोपेत होती. तिला जाग आली तेव्हा लोक मोठ्यामोठ्याने बोलत, धावपळ करत होते. आपली दगडाची हत्यारं घेऊन एके जागी गोळा करत होते. म्हणजे यांची युद्धाची तयारी चाललेली होती.

सुपर्णी आपले केस सावरतच उठली. तिच्या नजरेनं मोठी माय कुठे आहे याचा शोध घेतला. मायचा गंभीर चेहरा सुपर्णीला आज काही वेगळाच भासला. सर्वजण निघाले, तशी तिला राहवले नाही. हळूच सर्वांच्या नकळत तीही त्यांच्यामागून चालू लागली.

लहानू पुढे वाट दाखवत होता. आक्रमकांचे स्थान नजरेला पडले मात्र, मायच्या अंगात वीरश्रीच संचारली. आपल्या दोन्ही हातातली हत्यारे उगारत, मोठ्याने आव्हान देत ती धावू लागली.

भगत लोकांच्या रक्षणार्थ आलेल्या शस्त्रधाऱ्यांचे नेतृत्व दोन कोवळे तरूण करत होते. समोरून धावत येणाऱ्या स्त्रीचा आवेश पाहून सर्व काही क्षण स्तंभित झाले. आवेशाने जवळ येणारी तिची मूर्ती जणू काही संपूर्ण जगच व्यापत आहे, मोठी होत आकाशाला भिडते आहे. असा भासच त्यांना क्षणभर झाला.

परंतु दुसऱ्याच क्षणी विश्वमित्र ऋषींनी स्वतःला सावरले आणि मायकडे बोट दाखवत ते उद्गारले, "पाहतोस काय राम, हीच ती त्राटिका ! आमचे यज्ञ दरवेळी उद्ध्वस्त करणारी राक्षसी ! उचल तुझं धनुष्य आणि वेधून टाक तिला तुझ्या बाणांनी !"

रामाने तात्काळ आपले धनुष्य जोडले आणि त्यांचे बाण सटासट त्राटिकेच्या दिशेने झेपावू लागले.

बाणांनी पुरती घायाळ मोठी माय धावता धावता कोसळली. डोळे मिटण्यापूर्वी तिला जाणवले, सुपर्णी आकांत करत बेभानपणे तिच्या दिशेने धावत येत आहे!

●●

**रंजना कान्हेरे**, जनार्थः आदिवासी विकास प्रकल्प
फ्लॅट नं. १, गुरूदत्त हाऊसिंग सोसायटी,
विजयनगर, शहादा ४२५ ४०९

(पृष्ठ ४० वरून पुढे)

दाखला देण्याचे असे महत्त्वाचे अधिकार दिले आहेत. असेच अधिकार अनुसूचित क्षेत्राबाहेरील ग्रामसभेला दिले पाहिजेत.

## पुरेशी व स्वतंत्र वित्तीय साधने

स्थानिक स्वराज्य संस्थांना आपले कर्तव्य परिणामकारकरित्या पार पाडता यावे म्हणून पुरेशी वित्तीय साधने उपलब्ध असली पाहिजेत. यादृष्टीने कलम २४३ (I) नुसार वित्त आयोगाची तरतूद महत्त्वाची आहे. गेल्या पाच वर्षात ही घटनात्मक तरतूद राज्य सरकारने डावलल्याचे निदर्शनास आले आहे. वास्तविक वरील तरतुदीनुसार वित्त आयोगाचे कार्य व्हावे म्हणून राज्य सरकारने तत्परता दाखविली पाहिजे.

वित्त आयोगाच्या कार्याविषयी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरेशी माहिती दिली गेली पाहिजे, त्यांना आपली बाजू मांडण्यास पुरेशी संधी असली पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थेची बाजू मांडणारी प्रातिनिधिक संस्था स्थापन झाली पाहिजे.

वित्त आयोगाच्या कार्यकक्षेतील विकास प्रकल्प आणि कलम २४३ (G) अन्वये सुपूर्द केले जाणारे विषय व त्यामुळे वाढणाऱ्या जबाबदारीचा विचार करता राज्य शासनाची वित्तीय साधने हस्तांतरित करण्याचा विचार झाला पाहिजे.

स्थानिक स्वराज्य संस्थांना हिस्सा देताना त्याला अनुदानाचे स्वरूप असू नये. राज्य सरकारवर अवलंबून न राहता काही निकषांवर वित्तीय साधने स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळतील अशी व्यवस्था निर्माण केली पाहिजे.

जमीन महसूल स्थानिक स्वराज्य संस्थांना पूर्णतः देऊन राज्यसरकारला वसुलीच्या कमिशनच्या रूपात रक्कम देता येईल. व्यवसाय करासारखे काही कर पूर्णतः स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कक्षेत असले पाहिजेत. खासदार आणि आमदार निधीची रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थेला दिली पाहिजे.

## महिला, दलित व वंचितांना आरक्षण

महिला, दलित व वंचितांना केवळ सदस्य म्हणून नव्हे तर पदाधिकारातही आरक्षण देऊन ७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीने धाडसाने पुरोगामी पाऊल उचलले आहे; परंतु ते यशस्वी करण्यासाठी लागणारी जाणीव जागृती, संकल्पना व त्यासाठी प्रयत्नांचा अभाव प्रकर्षाने आढळत आहे. शासनाला या परिवर्तनाचा पाठपुरावा करण्यासाठी निर्धाराने उभे राहिले पाहिजे. त्यामागील सामाजिक आशय लोकांच्या निदर्शनास वेळोवेळी आणणे अगत्याने आहे. कायदा व शासनाच्याद्वारे सामाजिक परिवर्तनाचा हा विषय साध्य होत नाही, असे अनुभवांनी म्हणावे लागेल.

राजकीय पक्षांनी आपल्या एकूण कार्यक्रमात सामाजिक न्यायाच्या कार्याक्रमाला महत्त्व दिले असल्याने लोकांच्या स्तरावर योग्य वातावरण तयार करण्याची जबाबदारी त्यांनी पार पाडली पाहिजे. सामाजिक संस्थांच्या सहभागाने लोकांना समाज परिवर्तनाच्या आंदोलनात सहभागी करून घेतले पाहिजे.

राजकीय पक्षांनी समाज परिवर्तनाचा हा राष्ट्रीय कार्यक्रम यशस्वी करण्यासाी एकत्र येऊन

आचारसंहिता तयार करून, त्यातील अडथळे दूर करून लोकांत विश्वास निर्माण केला पाहिजे.

## राजकीय संकल्प आणि लोकआंदोलन

लोकशाही विकेंद्रीकरण हे राजकीय व सामाजिक परिवर्तनाचे पाऊल आहे. त्यामुळे समाजातील प्रस्थापित सत्ताधारी वर्ग आणि सनदी नोकरशहांचे अधिकार कमी होणार आहेत. राज्य सरकारने आपले अधिकार कमी करून स्थानिक स्वराज्य संस्थांना दिल्याशिवाय विकेंद्रीकरण शक्य नाही. सरकार व नोकरशाहीवर अवलंबून न राहता आपण आपले प्रश्न सोडवू शकतो असा विश्वास लोकांत जागविणे, लोकांनी विकास कार्यात सहभागी होणे व लोक नेतृत्व निर्माण होणे हा विकेंद्रीकरणाचा खरा हेतू आहे. सत्ता, संपत्ती, साधनसामुग्री, विद्या, ज्ञान, माहिती व कौशल्य या साऱ्यांचे सुस्पष्ट व परिणामकारक विकेंद्रीकरण झाल्याखेरीज लोकशाही विकेंद्रीकरणाला खरा अर्थ प्राप्त होणार नाही. आपल्या अधिकारांबद्दल जागृत व आग्रही आंदोलनानेच हे शक्य होणार असून राजकीय पक्षांना लोकमताची दखल घेणे भाग पडेल.

●●

## पृथ्वीच्या विध्वंसकांनो

आमची बाजू आहे सबळ सुंदर
नैसर्गिक जगण्यासाठी आमचं प्रेम
अन् घाण बाजू
आहे अतिक्रमणाचे परिक्रमा
आपल्या पृथ्वीच्या रक्षा करता करता
जे करतात सर्वनाश
सावधान ! पृथ्वीच्या विध्वंसकांनो
तुम्ही चोरलीय जमीन
नागवी केली सृष्टी
खरीदलीय संस्कृती

ती पृथ्वी ज्यावर तुम्ही राहायचे प्रेमाने
अदा केलीय किंमत
सृष्टी आम्हाला दे सामर्थ्य
समर्पणातून घेऊ दे शोध
आपलं दुःख ज्याचा स्वीकार करु
शकशील

आमच्या सर्वांवर दयेसह
आमच्यापर्यंत पोहचू शकशील
गरुडाचे पंख धारण करून
ज्याने आमची पोरं तुला ओळखतील
पृथ्वीचे विध्वंसक
ओळखत नाहीत गरुडाचे पंख
नाही जाणत एक दिवस पृथ्वी
उलटेल त्यांच्यावर अचानक

– बार्नी बुश (१९४५)

*(मराठी अनुवाद : भुजंग मेश्राम)*

# संवाद

आपण आठवणीने व आपुलकीने पाठविलेला हाकारा (ऑक्टो-डिसें. २०००) अंक मिळाला. मनपूर्वक आभारी आहे.

आदिवासी क्रांतीकारक 'खाज्या नाईक' वाचायला मिळावा अशी मनात कित्येक वर्षांपासून उत्सुकता होती, ती काही अंशाने का होईना पूर्ण झाली. क्रांतीवीर उमाजी नाईक, तंट्या भिल्ल व खाज्या नाईक यांची नावे कुठे ऐकायला मिळाली म्हणजे मी मनाने हळवा होतो. वास्तविक मनात वीरश्री संचारायला पाहिजे, पण मी हळवा होतो. का होतो, कुणास ठाऊक? माझ्या मनात ह्या माणसांविषयी करूणा दाटून येते. लोक कलावंतानीच या शूरवीरांना अमर केले आहे. इतिहासाने त्यांची नोंद का घेतली नाही? त्यांचा पराक्रम इतिहासाच्या पानावर का नोंदवला नाही? असे प्रश्न मनात उफाळून येतात, तेव्हा मी व्याकूळ होतो. ही माणसं निरक्षर होती. लौकीकार्थाने अडाणी होते, पण मनाने समृद्ध होते. विचाराने प्रगल्भ होते. वीर होते. शूर होते. त्यांना अन्यायाविरूद्ध बंड करण्याची प्रेरणा मिळाली, म्हणूनच ते इंग्रजांविरूद्ध पेटून उठले. लहानपणी केव्हातरी 'खाज्या नाईक' तमाशातल्या वगात ऐकला आहे. मनात ती अंधूक आठवण होती. आज वीरसिंग पाडवींचा लेख वाचल्यानंतर 'खाज्या नाईक' च्या आठवणीला उजाळा मिळाला.

१९८१ मध्ये मी शिरपूरला असताना रोहिणी, लाकड्या हनुमान, अंबापणी बिजासन घाट येथे जाऊन आलो आहे. तेव्हा मला अंबापाणी येथे क्रांतीवीर खाज्या नाईकाने त्यांच्या साक्षीदारांसह इंग्रजांशी घनघोर युद्ध केले होते असे ठाऊक नव्हते, माहीत असते तर मी त्या जागेवर जाऊन तिथल्या धुळीला वंदन केले असते. नागर संस्कृतीतल्या स्वातंत्र्य सैनिकांनी धुळे जिल्ह्यातील सिंदखेडा तालुक्यात एकदा असाच इंग्रजांचा खजिना लुटण्याची गोष्ट उत्तर महाराष्ट्रात नेमकी ऐकायला मिळते. परंतु शिरपूर तालुक्याच्या सीमेला लागून जवळ असलेल्या बिजासन घाटात त्यांच्याही अगोदर खाज्या नाईकाने इंग्रजांचा खजिना लुटला होता हे कोणी सांगत नाहीत. का सांगत नाहीत? वीरसिंग पाडवींनी 'हाकारा' व्यासपीठावरून खाज्या नाईकाचे दर्शन घडविले, आनंद झाला.

१) खाज्या नाईकाला त्याच्यातल्या अस्मितेची जाणीव झाली म्हणून त्याने इंग्रजांची नोकरी सोडली .

२) इंग्रजांनी चालविलेले अत्याचार त्याला सहन झाले नाहीत म्हणून तो चिडला आणि त्याने इंग्रजांविरूद्ध बंड केले. हे दोन मुद्दे मला भावले.

(खाज्या नाईक इंग्रजांचा खजिना लुटतो म्हणून तो लुटारू ठरतो, इतरांनी इंग्रजांचा खजिना लुटला तेव्हा ते स्वातंत्र्य सैनिक ठरतात, हे कसे?)

सुनिल कुमरे यांचे कुसुम आलाम यांच्या 'रानपाखरांची माय' ह्या कवितासंग्रहाचे परीक्षणही उत्तम आहे. वेधक आहे. नक्षलवादी व पोलीसही यांच्या क्रूर अत्याचारामुळे व लैंगिक छळामुळे कित्येक आदिवासी तरूणी उद्ध्वस्त झाल्या आहेत, हे ताईंनी जवळून पाहिल्यामुळे त्या पेटून उठतात. आदिवासी बांधवांवर होणारे अत्याचार व अन्याय पाहून त्यांचा ऊर दाटून येतो आणि त्या हातात शब्दांची मशाल घेतात. चंद्रपूर व गडचिरोली हे महाराष्ट्र सरकारचे मुलुख आहेत की नक्षलवाद्यांचे?

प्रचंड दहशतीने भरलेल्या या मुलुखात राहूनही कवयित्री नक्षलवाद्यांविरूद्ध लेखन करते हे कवयित्रीचे फार मोठे धाडस आहे. कवयित्री निर्भय आहे, धीट आहे. बंद दारातल्या साहित्यिक संस्कृतीची विरोधक म्हणून मला ह्या कवयित्रीबद्दल आदर वाटतो. त्यांचीही कविता व लेख मला आवडले.

भुजंग मेश्राम यांच्या दोन अनुवादित कविता वाचल्या, आवडल्या. त्यांच्या स्वतःच्या कविता वाचणे मला फार आवडले असते. ती संधी कधीतरी मिळेल अशी आशा व्यक्त करतो.

आदिवासींना त्यांची स्वतःची संस्कृती आहे, परंपरा आहे. ते त्यांच्या परंपरेचे व संस्कृतीचे आणि कलागुणांचे निष्ठापूर्वक जतन करतात. आदिवासींच्या मनाच्या चाळणीतून अंधश्रद्धा गळून जावी व उरावी फक्त निखळ श्रद्धा, देवावरची, धर्मावरची व माणसावरची आणि निसर्गावरची याबाबत मी आशावादी आहे. प्रा. कामिनी पाटील यांचाही लेख आवडला.

प्रत्येक समाजात गट व तट असतात, तसे ते आदिवासी समाजातही आहेत. आदिवासी स्वाभीमानी आहेत, तसे काही लाळघोटेही आहेत. काही मवाळ विचारांचे आहेत तर काही जहाल विचारांचे आहेत.

काही उच्चशिक्षित माणसं आदिवासी समाजापासून अलगद दूर झाली आहेत. (हे ठराविक एका समाजाचे दुखणे नाही. प्रत्येक समाजात हीच बोंब आहे) तर काही उच्च शिक्षित माणसं सेवाभावी वृत्ती स्वीकारून समाजसेवेत कार्यरत आहेत. काही समाजाचे मूळ धरून घट्ट उभे आहेत, तर काही ना इकडे ना तिकडे अशा अवस्थेत आहेत. डॉ. गोविंद गारे यांची आदिवासी समाजाबद्दलतची निष्ठा, तळमळ व आदिवासी समाजाचा अभ्यास सर्वांना ज्ञात आहेच.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचा हा आदिवासी विशेषांक मला खूप खूप आवडला. परिषदेचे पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सामाजिक कार्य उल्लेखनीय आहे. कै. गं. बा. सरदार यांच्यापासून प्रेरणा घेऊन परिषद कार्य करीत आहे याचा आनंद होतो.

धन्यवाद !

आपला कृपाभिलाषी

**प्रल्हाद खरे**

मु. पो. बांभोरी (गिरणाका) ता. धरणगाव, जिल्हा जळगाव ४२५००२

---

निवेदने

## वाचकांसाठी

*'हाकारा' चा ऑक्टोबर - डिसंबर २००१ हा अंक महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या रौप्यमहोत्सवानिमित्त मे २००१ मध्ये **'अस्मिता व विकास'** विषयावर संपन्न झालेल्या अधिवेशनावर आधारित आहे. या अधिवेशनातील काही मुख्य विषयांवर वक्त्यांनी व्यक्त केलेले विचार या अंकात देण्यात येतील. विचारांचे संकलन चालू असल्याने अंक प्रसिद्धीस विलंब होईल. कृपया सहकार्य करावे ही विनंती.*

## लेखकांसाठी

*'हाकारा' साठी आदिवासी, ग्रामीण, भटक्या विमुक्त व दलितांच्या समस्या व जीनव - संस्कृतीवर आधारित विषयांवरचे लेखन जरूर पाठवावे. लेखन कथा, कविता, स्फूट लेखन स्वरूपात चालेल. शब्दसंखेची मर्यादा नाही. मात्र लेखन कागदाच्या एकाच बाजूने लिहिलेले व सुवाच्य अक्षरात असावे.*

**- संपादक**

# हाकारा अंक-सूची

१) जानेवारी - मार्च १९८० : जबरन जोत जंगल जमीन
२) एप्रिल - जून १९८० : आदिवासी व शिक्षण
३) जुलै - सप्टेंबर १९८० : आदिवासी व वनसंवर्धन
४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८० : आदिवासी साहित्य व कला
५) जानेवारी-मार्च १९८१: दलितांना सवलती व राखीव जागा
६) एप्रिल - जून १९८१ : आदिवासी व आरोग्य
७) जुलै - सप्टेंबर १९८१ : वनशेती व संवर्धन
८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८१ : रोजगार हमी योजना
९) जानेवारी - मार्च १९८२ : धरणे व विकास
१०) एप्रिल - जून १९८२ : धरणे व विकास
११ - १२) जुलै - डिसेंबर १९८२ : जंगल व्यवस्थापन
१३) जानेवारी - मार्च १९८३ : आदिवासी व दारू
१४) एप्रिल - जून १९८३ : आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
१५) जुलै-सप्टेंबर १९८३ : प्रा.सरदार गौरव अंक/ आदिवासी साहित्य
१६) ऑक्टोबर - डिसेंबर १९८३ : आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
१७-१८) जानेवारी-जून १९८४ : आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
१९) जुलै - सप्टेंबर १९८४ : आदिवासी स्त्री
२०) ऑक्टोबर-डिसेंबर १९८४ : आदिवासी आरोग्य व शिक्षण
२१) जानेवारी - मार्च १९८५ : आदिवासी संघटन
२२) एप्रिल - जून १९८५ : जमीन हस्तांतर
२३) जुलै - सप्टेंबर १९८५ : आदिवासी महिला
२४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८५ : आदिवासी व सरकार
२५) जानेवारी - मार्च १९८६ : जंगल व धरण
२६) एप्रिल - जून १९८६ : आदिवासी कला
२७) जुलै - सप्टेंबर १९८६ : आदिवासी व वेठबिगारी
२८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८६ : आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय
२९) जानेवारी - मार्च १९८७ : भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
३०) एप्रिल-जून १९८७ : आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
३१-३२) जुलै-डिसेंबर १९८७ : राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न
३३) जानेवारी - मार्च १९८८ : सवलती अपहरणाची समस्या
३४) एप्रिल - जून १९८८ : आदिवासी साहित्य
३५-३६) जुलै - डिसेंबर : आदिवासी समाज व संस्कृती
३७-३८) जानेवारी -जून १९८९ : डॉ. वेरीअर एल्विन विशेषांक
३९-४०) जुलै-डिसेंबर १९८९ : व्यवसाय मार्गदर्शन
४१-४२) जाने.-जून १९९० : महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
४३) जुलै - सप्टेंबर १९९० : जागतिक आदिवासी
४४) ऑक्टोबर-डिसेंबर १९९० : गं. बा. सरदार स्मृति विशेषांक
४५-४६) जानेवारी-जून १९९१ : आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
४७) जुलै - सप्टेंबर १९९१ : आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
४८) ऑक्टोबर-डिसेंबर १९९१ : आदिवासी जीवन व संस्कृती
४९-५०) जानेवारी-जून १९९२ : सर्वसाधारण आदिवासी
५१-५२) जुलै-डिसेंबर १९८२ : अनुताई वाघ विशेषांक
५३-५४) जानेवारी-जून१९९३ : आदिवासी धर्म, सण व उत्सव
५५-५६) जुलै-डिसेंबर १९९३ : धरण - विस्थापन व पुनर्वसन
५७) जानेवारी-मार्च १९९४ : सर्वसाधारण आदिवासी
५८) एप्रिल-जून १९९४ : आदिवासी एकता परिषद
५९) जुलै-सप्टेंबर १९९४ : आदिवासी विकासाची सैध्दान्तिक भूमिका
६०) ऑक्टोबर - डिसेंबर १९९४ : आदिवासी जमाती
६१-६२) जानेवारी - जून १९९५ : राणीपूर अभ्यास विशेषांक
६३) जुलै - सप्टेंबर १९९५ : कुपोषण विशेषांक
६४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९५ : पर्यावरण विशेषांक
६५) जानेवारी - मार्च १९९६ : आदिवासी जमाती
६६) एप्रिल - जून १९९६ : महाराष्ट्र, ओरिसा अभ्यास दौरा
६७) जुलै - सप्टेंबर १९९६ : आदिवासी जमाती
६८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९६ : आदिवासी शिक्षण
६९-७०) जानेवारी-जून १९९७ : वारली लोकगीते व बोलीभाषा
७१) जुलै - सप्टेंबर १९९७ : पंचायत राज विशेषांक
७२) ऑक्टोबर-डिसेंबर १९९७ : साहित्य संमेलन विशेषांक
७३) जानेवारी-मार्च १९९८ : वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
७४) एप्रिल-जून १९९८ : सर्वसाधारण आदिवासी
७५ - ७६) जुलै - डिसेंबर १९९८ : आदिवासी समाज व संस्कृती
७७) जानेवारी-मार्च १९९९ : आदिवासी व आर्थिक धोरण
७८) एप्रिल-जून १९९९ : आदिवासी विकास व संस्कृती
७९-८०) जुलै - डिसेंबर १९९९ : बोर्डी परिसर अभ्यास
८१) जानेवारी-मार्च २००० : आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
८२) एप्रिल - जून २००० : स्त्रिया आणि आरोग्य
८३) जुलै-सप्टें. २००० : पाणी टंचाई आणि पाणलोट विकास
८४) ऑक्टोबर-डिसें. २००० : आदिवासी जीवन आणि संस्कृती
८५) जानेवारी - जून २००१ : अस्मिता व विकास (विशेषांक)

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण. शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरू करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना 'हाकारा' चे केवळ वार्षिक सदस्यत्व मिळेल.)

### मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीवन सभासद ६०० रूपये (फक्त व्यक्तींसाठी)

'हाकारा' वार्षिक सभासद ६० रूपये (व्यक्तींसाठी)

'हाकारा' वार्षिक सभासद १०० रूपये (संस्थांसाठी)

परिषदेच्या आजीवन सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

### पत्रव्यवहाराचा पत्ता

रा. के. मुटाटकर, अध्यक्ष
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा !